# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २८/०३/२०१८**

आज बुधवार दि. २८/०३/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दुपारी २.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. १७/०३/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १३) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १४) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १५) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १६) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १७) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १८) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| १९) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २०) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २१) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २२) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २३) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २४) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २५) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| २६) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| २७) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| २८) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| २९) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ३०) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| ३१) | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| ३२) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| ३३) | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |

| | | |
|---|---|---|
| ३४) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३६) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३८) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३९) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४०) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४१) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४२) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४३) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४४) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | सदस्या |
| ४५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५१) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५२) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५३) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५४) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५५) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५६) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५७) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५८) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५९) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६०) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६१) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६३) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६४) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६८) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६९) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७०) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| **७५)** | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| **७६)** | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| **७७)** | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| **७८)** | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| **७९)** | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| **८०)** | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| **८१)** | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| **२)** | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| **३)** | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| **४)** | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| **५)** | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| **६)** | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| **७)** | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| **८)** | **पाटील प्रविण मोरेश्वर** | **सदस्य** |
| **९)** | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| **१०)** | **शेख रुबीना फिरोझ** | **सदस्या** |
| **११)** | **भोईर कमलेश यशवंत** | **सदस्य** |
| **१२)** | **परमार हेतल रतिलाल** | **सदस्या** |
| **१३)** | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |

**मा. महापौर :-**

नमस्कार उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, मा. आयुक्त, अधिकारी, पत्रकार बंधू नागरिकांचे स्वागत करत आहे. महाविर जयंती, हनुमान जयंती, इस्टर सणाच्या सर्वांना शुभेच्छा. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी ही विनंती.

**मा. आयुक्त :-**

परिवहन बजेटमध्ये सुरुवातीचे पेज चुकुन लागले आहे. मी आपल्या सर्वांची क्षमा मागतो. ते दुरुस्तीला दिलेले आहे. त्याची काळजी घेतली जाईल. नविन पान करुन त्याला जोडले जाईल.

**प्र. नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा . विशेष महासभा बुधवार दि . २८/०३/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे .** प्रकरण क्र. १०१, **अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत . (मा. स्थायी समिती सभा दि . १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . ११९, ठराव क्र. १०२)** आजच्या महासभेत सन २०१७-१८ चे सुधारित सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक स्थायी समिती सभापती धृवकिशोर पाटील हे मा. महासभेला सादर करण्यासाठी येत आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सर्व महापुरूषांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन ! या शहराच्या प्रथम नागरिक मा.

महापौर डिम्पलजी मेहता, मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती, मा. आयुक्त पवार साहेब, मा. अतिरिक्त आयुक्त, मा. उपायुक्त, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, सर्व सन्मा. नगरसेवक नगरसेविका, पत्रकार व उपस्थित नागरीक मिरा-भाईंदर शहराचे मा. आमदार व मार्गदर्शक नरेंद्रजी मेहता यांच्या व आपल्या सर्वांच्या शुभेच्छांमुळे मला स्थायी समितीचे सभापती पद भूषविण्याचे भाग्य लाभले आहे, त्याबद्दल मनापासुन आभार व्यक्त करतो. आणि हे पहिलेच बजेट या पंचवार्षिक निवडणूकीच्या अंतर्गत सादर करताना मला खूप आनंद होत आहे. या देशाला प्रगतीपथावर नेणारे आदरणीय मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब, महाराष्ट्र राज्याचे कार्यसम्राट मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब ह्या शहराचे कार्यसम्राट आमदार आणि ह्या शहराला चांगली प्रगती देणारे असे नरेंद्रजी मेहता साहेब प्रथम हे बजेट सादर करताना मिरा भाईंदर ह्या शहराला आणखीन अतिरिक्त भरपूर आमदार आहेत. हे मान्य करतो परंतु ज्यावेळी मी माझे निवेदन करतो त्यावेळी मला ज्या लोकांनी साथ दिली ज्या लोकांनी मला सहकार्य केले अशा लोकांचे नाव घेणे हे क्रमप्राप्त असते म्हणून त्यांची नावे घेतो. शहराची लोकसंख्या मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मिरा भाईंदर महापालिकेचे जे उत्पन्न आहे ते फार कमी आहे. आणि अशा मर्यादित उत्पन्नामध्ये मिरा भाईंदरला चांगल्या सोयी सुविधा देणे हे मोठे एक आवाहन आहे. आयुक्त साहेबांनी आणि त्यांच्या टिमने ह्या २०१८-१९ चे बजेट बनविले उत्पन्नाचे स्त्रोत कमी असताना आणि खर्च खुप मोठा आहे. आपल्याला भरपूर विकास कामे करायची आहेत. परंतु उत्पन्न कमी असल्यामुळे ह्या सगळ्या गोष्टींचे ताळमेळ घालणे याच्यासाठी खुप मोठे आवाहन आहे. जमा खर्चाची कसरत करणे आमचे अकाऊंटन्ट बेलवटे साहेब यांना फार मोठी दिक्कत होत आहे. पैसे जे येतात आणि इकडे जाण्याचा स्त्रोत जास्त असतो. पैसे येण्याचा स्त्रोत कमी असतो आणि ह्या सगळ्यांमध्ये जी विकास कामे व्हायला पाहिजे ती कवकास कामे करण्याचा त्यांचे धैय्य असते. आज आपण निवडून आल्यानंतर आपल्या प्रत्येकाला असे वाटते की आपल्या प्रभागामध्ये ही काम झाली पाहिजे ह्या शहराचा असा विकास झाला पाहिजे. या शहराला मुलभुत सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे आणि हे सगळे करताना पहिल्यांदा ज्यावेळी बजेट बनविणे सुरु केले त्यावेळी नागरिकांची एक मिटींग बोलवली. आपका सुझाव आपका बजेट असा एक प्रोग्राम लावला. आमचे सन्मा. सदस्य किती हुशार आहेत बघा. यांना अजुन हे ही माहित नाही की आपल्या बजेटची पोजीशन कशी आयुक्त साहेब स्थायी समितीला बजेट सादर करतात आणि स्थायी समिती त्याच्यावरती विचार विनिमय करते आणि आपल्या बाजूला बसलेले सन्मा सदस्य सभेला उपस्थित होते. त्याच्या अगोदर हा प्रोग्राम झालेला आहे. त्याच्यानंतर हे बजेट झाले. तुम्ही आता म्हणतात मॅडम ह्या शहराचे आमदार मा. प्रताप सरनाईक साहेब आणि माजी आमदार मुजफ्फर हुसेन साहेब यानी नवभारत टाईम्समध्ये त्यांनी त्याचे कोड दिले त्या कोडमध्ये सांगितलं की स्थायी समितीचा बजेट पास झाला आणि त्याच्यानंतर हे “आपका सुझाव आपका बजेट” हा प्रोग्राम घेतला. परंतु त्यांना हे माहित नाही त्यांचे इथे सदस्य स्थायीमध्ये होते. आम्ही ३ दिवस चर्चा केली. त्याच्यानंतर हे बजेट पास झाले आणि त्याच्या अगोदर हा प्रोग्राम आम्ही घेतला होता.

**निलम ढवण :-**

तुमचे बोलून झाल्यानंतर ह्या संदर्भात मी बोलणार आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

धन्यवाद मॅडम सभेची शिस्त असते की सभापतींनी आपले बजेट सादर केल्यानंतर त्यांचे निवेदन होते. २००२ पासून त्याच्या अगोदर नगरपरिषद असताना प्रत्येक सभापती त्याच्यावरती निवेदन केलेले आहे आणि निवेदन करताना कोणीही सदस्यमध्ये बोलले नाहीत. आपण बोलतात मला ते मुद्दाम बालावे लागते ही गोष्ट मला टाळायची नव्हती. हे दोन्ही आमदार जे आहेत हे माझ्यासाठी आदरणीय आहेत. आजही आदरणीय आहेत आणि आमचे चांगले संबंध आहेत आणि मी त्यांना मानतो. परंतु तुम्ही हा विषय काढला मी ज्यावेळी सांगितल आपका सुझाव आपका बजेट हा कार्यक्रम आम्ही घेतला. न भुतो न भविष्यतो हे पहिल्यांदा मॅडम आम्ही केलेले आहे. आणि हे बजेट नागरिकांसाठी आहे. आणि म्हणून नागरिकांच्या सुचना नागरिकांचे सजेशन घेतले आहेत. हा पहिल्यांदा आम्ही पायंडा चांगला काढलेला आहे. आणि त्याच्यावरती टिका टिप्पणी करणे हे प्रत्येकाचे काम असते. विरोधी पक्षाचे काम असते ह्या मताशी मी पण सहमत आहे. परंतु स्थायी समितीमध्ये बजेट मंजुर झाले नव्हते. त्याच्या अगोदर त्यांनी कोड दिलं की बजेट मंजुर झाले आहे आणि ह्याच्यानंतर ही सभा घ्यायची हा कार्यक्रम घ्यायचा हे फक्त थोतांड मांडलेले आहे. हा फक्त देखावा आहे हे चुकीच होतं म्हणून मला ते क्लेरीफिकेशन करावे लागते. मी हे क्लेरीफिकेशन करणार नव्हतो मॅडम आपणाला काही वाईट वाटल असेल तर आय ॲम एक्स्ट्रेमली सॉरी. अंदाजपत्रक बनवताना या शहराच्या नागरिकांना मुलभूत सुविधा देणे हे क्रमप्राप्त आहे. आणि हे आमचे पहिले कर्तव्य आहे. शहराच्या नागरिकांचे राहणीमान उंचवावे, ह्या शहराचा दर्जा वाढवावा. ह्या

शहरातील लोकांना पाणी चांगले मिळावे, या शहरातील लोकांना चांगले आरोग्य मिळावे, चांगली आरोग्य सुविधा मिळावी या शहरातील विद्यार्थ्यांना चांगलं शिक्षण मिळावे ह्या शहरातील मुलांना खेळाचे मैदान मिळावे ह्या शहरातील नागरिकांसाठी उद्याने मिळावी. जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र पाहिजे अशा अनेक योजना या अर्थसंकल्पामध्ये आम्ही टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे बजेट बनवताना आम्ही समाजातील सगळ्या घटकांचा विचार केला आहे. ह्या शहराचा चौफेर विकास कसा येईल याचे आम्ही बरोबर लक्ष केंद्रीत केलेले आहे. हे अंदाजपत्रक एक ऐतिहासिक लोकांनी मुख्य आणि शहराचा चौफेर विकास करण्यासाठी हे अंदाजपत्रक बनविलेले आहे. निवडणुकीत जे आम्ही वचने दिली होती ती वचनपूर्तीचे हे आमचे पहिले पाऊल आहे. आमदार नरेंद्र मेहता यांचे जे एक व्हिजन आहे या शहरातील आमचे महापौर एक व्हिजन आहे. हे व्हिजन डोळ्यासमोर ठेऊन आम्ही हे अंदाजपत्रक बनवल आहे आणि हे अंदाजपत्रक बनवताना मला प्रशासनाने आणि माझ्या बरोबर असणाऱ्या सगळ्या स्थायी समितीला सदस्यांचे चांगले सजेशन मिळाले आहे. त्यांची मला साथ लाभलेली आहे आणि तीन दिवस आम्ही या विषयावरती चर्चा केलेली आहे. मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगत आहे. एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील सगळ्यात जलद आणि विकास गतीने जे ह्या शहराने पाऊल टाकले हे अप्रतीम आहे. भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर आमदार नरेंद्र मेहता, डिम्पल मॅडम, चंद्रकांत वैती साहेब आणि आमच्या सगळ्या सदस्यांनी हे शहर कस डेव्हलप होईल, या शहराचा कसा विकास होईल हे एकमेव लक्ष ठेवलेले आहे. आणि अस हे अंदाजपत्रक बनविलेले आहे. या अंदाजपत्रकामध्ये अनेक बाबींचा उल्लेख केलेला आहे. फक्त आपण खर्च बघतो. इनकम साईट बघत नाही आणि म्हणून ह्यावेळी मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ज्यांच्या मालमत्तांवरती कर आकारणी झालेली नाही अशा मालमत्ता शोधुन त्यांच्यावरती कर आकारणी करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेत इन्कम होण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्याच्या बरोबरच काही लोकांनी आपला चेंज ऑफ व्ह्यू केलेला आहे. काहींचे रेसिडेन्शीअल, कर्मशियल त्यांनी केलेले आहे. पण त्यांनी त्यांचा हाऊस टॅक्स वापरात बदल न केल्यामुळे उत्पन्न कमी होत आहे. ते सुध्दा आम्ही शोधुन काढणार आहोत. याच बरोबर ऑनलाईन कर आकारणी पध्दत ही सुध्दा प्रशासनाला सांगितले आहे. कारण की वारंवार महानगरपालिकेमध्ये येऊन अर्ज देऊन कर आकारणी होत नाही म्हणून घरी बसल्या ऑनलाईन कर आकारणी केली त्याच्यामध्ये आपल्या उत्पन्नामध्ये सुध्दा भर होणार आहे. म्हणून हा उपक्रम आम्ही राबवणार आहोत. ह्यानंतर महाराष्ट्र शासनाचा एक नविन जी.आर आलेला आहे की ३१ डिसेंबर २०१५ पूर्वी जे अनधिकृत बांधकाम असतील ते अनधिकृत बांधकाम नियमित करणे आणि त्या नियमित करताना त्यांच्यावरती जो दंड आणि शुल्क आहे जो डेव्हलपमेंट चार्ज आहे तो सुध्दा मिळेल आणि तो मिळाला की आपल्या महापालिकेच्या उत्पन्नात आणखीन वाढ होईल. ह्या बरोबर आयुक्त साहेब सुध्दा मी सांगितल होत की मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या काही मालमत्ता आहेत त्या जर आपण भाड्याने दिल्या उदाहरण एल.बी.टी. ऑफिस, रामनगर ऑफिस इथे जर आपण काही आपले मालमत्ता त्याच्यामध्ये युज नसेल आपल्या पालिकेला तर त्या जर आपण भाड्याने दिल्या तर त्याचे सुध्दा इन्कम येईल आणि आपल्या महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच स्टॅन्डिंग कमिटीमध्ये चर्चा करताना परवाना विभाग जो आहे आयुक्त साहेब ह्या परवाना विभागामध्ये सुध्दा इन्कम अपेक्षेप्रमाणे येत नाही. त्याचे जर आपण आऊटसोर्सिंग केलं. जर बाजार फी आपण वसुल करतो तशीच जर आपण परवाना विभागाची सुध्दा आऊट सोर्सिंग केल. सिंगल विंडो सिस्टम जर केली तरी सुध्दा आपल्या उत्पन्नामध्ये भरपूर उत्पन्न वाढू शकेल. त्याचप्रमाणे आपण जाहिराती जे छोटे बॅनर लावतो. बॅनरची जी परमिशन घ्यायची पध्दत आहे ती खुप किचकट आहे. ती जर आपण सिम्पली फाय जर केली आपल्याला याचे सुध्दा उत्पन्न वाढू शकते. त्याचबरोबर जे शहरात मोठे होर्डिंग्ज लागतात तर त्या होर्डिंग्जचे जे दर आहेत ते दर सन २०१४ चे आहेत. हे २०१८ जवळ जवळ ४ ते ५ वर्ष झाली आणि जाहिरातीचे दर हे वाढलेले आहेत. हे सुध्दा दर आपण वाढविले तर आपल्याला सुध्दा त्याच्यामध्ये उत्पन्नात भर पडू शकते. त्याच बरोबर अनेक कंपन्या जाहिराती त्या दुकानावरती असतात आणि त्याचे भाडे हे दुकानदार घेतात. पण त्याचा जो टॅक्स आहे हे आपल्या महापालिकेला ते जमा करत नाही. याच्यावरती आपण व्यवस्थित लक्ष केंद्रीत केल तरी सुध्दा आपल्या उत्पन्नात वाढ होऊ शकते आणि हे सगळ्या बाबी आयुक्तांना आणि प्रशासनाला स्थायी समितीच्या चर्चेमध्ये आम्ही सांगितलेल्या आहेत. ह्याचप्रमाणे ह्या वर्षीचे अंदाजपत्रकामध्ये एक चांगल मिनी ऑडी ड्रिम मिरा भाईंदर शहराला उपलब्ध करुन द्यावे म्हणून आम्ही ५ करोडची तरतुद करुन दिलेली आहे. ह्याच शहरामध्ये अनेक उद्याने विकसित करायची आहेत. आरक्षण क्र. २४२, २२६, ३६८ असे अनेक आरक्षण आहेत. ते उद्यान विकसित करणे करिता सुमारे ११ करोडची प्रोव्हिजन सुध्दा या बजेटमध्ये केलेली आहे. ज्याप्रमाणे मिरारोडचे रेल्वे स्टेशन आपण सुशोभित केले. तिकडचा परिसर एकदम चांगला केला, देखणा केला आणि मिरारोडचे जे व्हॅल्युएशन आपण वाढवलं त्याचप्रमाणे भाईंदर पूर्व आणि भाईंदर पश्चिम चे जे

रेल्वे स्टेशनचा जो परिसर आहे तो सुध्दा सुशोभिकरण करुन भाईंदरचा सुध्दा स्थान आहे ते वरती उचलण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. घोडबंदर किल्ला गेल्या अनेक वर्षापासून घोडबंदर किल्ल्याची आपण प्रोव्हिजन ठेवतो. परंतु आता प्रशासनाला सांगुन की ह्या किल्ल्याची जी जागा आहे हे आपल्याकडे वर्ग करुन तो सुशोभिकरण करण्याकरिता ॲप्रोक्सिमेटली २ कोटी तरतुद केलेली आहे. ह्या शहरामध्ये नविन रस्ते बांधणे ह्या शहरांच्या रस्त्यांचे रुंदीकरण करणे या शहराच्या रस्त्याचे साईनिंग करणे याच्यासाठी सुध्दा जवळ जवळ २० करोडची तरतुद ठेवलेली आहे. तसेच ह्या शहरातील जे रस्ते आहेत जे वारंवार खड्डे होतात. डांबराच्या रस्त्यामध्ये ते सुध्दा काँक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. सुमारे १०० करोड रुपये लोन घेऊन बाकीचा महापालिकेचा फंड देऊन असे अनेक ह्या शहरातील रस्ते प्रमुख रस्ते कॉक्रीटीकरणाचा सुध्दा प्रयोजन याच्यामध्ये केलेले आहे. त्याचप्रमाणे ह्या शहरामध्ये एक चांगल बुध्दविहार देण ह्या शहराच्या काही ठिकाणी कम्युनिटी हॉल बांधणे हे सुध्दा करण्यांत येणार आहे. याच्यासाठी सुध्दा ११ कोटी रुपये तरतुद केलेली आहे. त्याच बरोबर ह्या शहरामध्ये जे अनधिकृत फेरिवाले बसत आहेत. यांचे पण समायोजन करण्याकरिता ठिक ठिकाणी चांगले मार्केट बांधण्याकरिता मार्केटचे प्रोव्हिजन केलेले आहे. भाईंदर पूर्व पश्चिम चौपाटी सुशोभिकरण नुकतेच मा. मुख्यमंत्री साहेब आले मुख्यमंत्री साहेबांनी या मिरा भाईंदरसाठी जवळ जवळ ९ आरक्षण मिरा भाईंदर शहराला फ्रि ऑफ चार्ज हॅन्ड ओव्हर केलेले आहेत. जवळ जवळ २९.८४ हेक्टर जमिन दिलेली आहे. सुमारे ५०० ते ६०० करोडची जमिन ह्या मुख्यमंत्री साहेबांनी आपल्या शहराला आमदार नरेंद्र मेहता यांच्या मदतीने महापौर डिम्पल मेहता यांच्या मदतीने आपल्या शहराला फ्री ऑफ चार्ज दिलेली होती. आणि त्या चौपाटीचे सुशोभिकरण करणेकरिता आपण हे केलेले आहे. त्याचबरोबर मागच्या बुधवारी महापौर मॅडमने सी.आर.झेडचे जे सचिव साहेब आहेत श्री. सतिश गवळे साहेब त्या मिटींगमध्ये महापौर मॅडम, आमदार नरेंद्र मेहता, उपमहापौर वैती साहेब, सभागृहनेता पाटील साहेब आणि आयुक्त साहेब सुध्दा होते आणि अशा अनेक वर्ष प्रलंबित असलेले आपल्या शहरातील ४ रस्त्यांना सी.आर.झेड ची परवानगी भेटलेली आहे. त्याच्यामध्ये आपला जेसल पार्क ते घोडबंदरचा रस्ता आहे. त्याच्यानंतर भाईंदर वेस्ट रेल्वे स्टेशन श्री. सुभाषचंद्र बोस मैदान आहे. त्याच्यानंतर सुभाषचंद्र बोस मैदान ते मोर्वा आहे आणि मिरारोड रेल्वे पॅरलल रोड अशा ४ रस्त्यांची एन्व्हॉरमेंट क्लिअरन्स झालेले आहे. आता याची पुढची स्टेप आहे जी मॅंग्रोज तोडण आणि त्याला रिप्लान्ट करणे याच्यासाठी महापालिका आणि आम्ही प्रयत्नशील आहोत. आणि ह्या चौपाटीचे सुशोभिकरण करण्याकरिता आपण प्रोव्हिजन केलेली आहे. त्याचप्रमाणे ह्या शहरामध्ये स्पोर्टस् कॉम्पलेक्ससाठी चांगले तरण तलाव आहे. आणखीन भाईंदर पश्चिमेला एक तरण तलाव बनणे आणि हाईवे लगत लोढा गृह संकुल ॲमिनिटी ओपन स्पेस जे आपण तरण तलाव करणार आहोत त्याच्यासाठी अडीच करोडची तरतुद केलेली आहे. ह्या शहरामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी ५ ते ६ विरंगुळा केंद्र आहेत त्यांची डिमांड आणखीन वाढलेली आहे. त्याच्यामुळे ह्या शहरामधील आणखीन ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तयार करण्याकरिता प्रोव्हिजन ठेवलेली आहे. ह्या शहरामध्ये जे विद्यार्थी आहेत त्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याकरिता ७ ते ८ अभ्यासिका आहेत. त्या सुध्दा कमी पडत असल्यामुळे आणखीन अभ्यासिका आणि वाचनालय तयार करण्याकरिता सुध्दा प्रोव्हिजन ह्या बजेटमध्ये ठेवलेली आहे. ह्या शहरामध्ये विविध तलाव आहेत आणि ह्या तलावांचे सुशोभिकरण करण्याकरिता सुध्दा ४ कोटींची तरतुद करण्यांत आलेली आहे. भाईंदर परिसरामध्ये ज्या शाळा आहेत ह्या शाळेच्यावरती मजले वाढविणे, शाळा बांधणे काजुपाड्याची शाळा बांधणे याच्यावर सुध्दा आपण तरतुद ठेवलेली आहे. या शहरामध्ये अशा अनेक शौचालय सुध्दा केले आहेत. हगणदारी मुक्त जी शासनाची संकल्पना होती ती संकल्पना १०० टक्के आपण पूर्ण करुन पुन्हा करा. म्हणून शौचालयाची पण तरतुद केलेली आहे आणि एक नविन ई-टॉयलेट फ्री फायर ब्रिगेड टॉयलेट सुध्दा ह्या बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेली आहे. तसेच ह्या शहरामधील स्मशानभुमी, दफनभुमी ह्या करिता सुध्दा एक चांगली साडे तीन ते ४ करोडची तरतुद करण्यांत आलेली आहे. अमृत अभियान योजने अंतर्गत २२ नाल्यांचे बांधकाम सुध्दा या बजेटमध्ये प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे काशिमिरा उड्डाणपुलाखाली ती जागा सुध्दा शासनाने आपल्याला हॅन्ड ओव्हर केलेली आहे. आणि तिथे सुध्दा एक अप्रतिम एक चांगल, देखण सुशोभिकरण करण्याचे प्रयत्न केलेला आहे. त्याच्यामध्ये सुध्दा आपण ३ करोड रुपयांची तरतुद एक टोकन अमाऊंट म्हणून ठेवलेली आहे. तसेच मिरारोड पूर्व पश्चिम जोडण्याकरिता एक चांगला फ्लायओव्हर ब्रीज बांधण्याचेही प्रोव्हिजन ठेवलेले आहे. ते एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातुन बांधणार आहोत पण थोडस एक ५० लाखाचे टोकन अमाऊंट म्हणून ठेवण्यांत आलेले आहे. अतिक्रमण विभाग सक्षम करण्याकरिता मागे सभेमध्ये चर्चा झाली होती की आरक्षण क्र. १२२ मध्ये भरपूर अतिक्रमण झालेली आहेत. अतिक्रमण विभाग सक्षम करण्याकरिता सुध्दा ४ कोटीची प्रोव्हिजन करण्यांत आलेली आहे. घनकचरा प्रकल्प जो आहे. उत्तन येथील तो सुध्दा सौराष्ट्र एनव्हारमेंट प्रोजेक्ट लि. यांना आपण देऊन ७

वर्षाकरिता हा प्रोजेक्ट चालवण्याकरिता ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करण्याचा चांगला प्रोजेक्ट आपण लवकरात लवकर सुरु करणार आहोत. त्यासाठी डस्टबीनसाठी सुध्दा आपण तरतुद ठेवलेली आहे. तसेच महापालिकेच्या शाळेची गुणवत्ता वाढविण्याकरिता एक चांगला विचार सुध्दा केलेला आहे. ह्या शाळांमध्ये ई-लर्निंग फॅसिलिटी, डिजीटलायजेशन करण्याकरिता तरतुद करण्यांत आलेली आहे. परत ह्या शाळांच्या इथे स्थानिक जे नगरसेवक असतील ते नगरसेवक आणि मुख्याध्यापक आणि टिचर्स आणि त्यांचे पालक यांची एक सहविचार सभा भरुन त्यांना जे लागणारे ड्रेसेस आहेत त्यांना जे लागणारे शैक्षणिक साहित्य ते देण्याकतिरा एक सहविचार सभेचे आयोजन करुन करण्याचे प्रोव्हिजन आणि तसेच ज्या शाळा आहेत त्या शाळेचे संगणक प्रशिक्षण करण्याकरिता सुध्दा एक चांगली तरतुद ठेवलेली आहे. ह्या व्यतिरिक्त आर.टी.ई. कायद्यानुसार जे आर्थिक आणि दुर्बल घटकांचे जे विद्यार्थी आहेत एस.सी. एस.टी. कॅटेगरीमधले त्यांना सुध्दा ऑनलाईन प्रवेश प्रत्येक शाळेमध्ये मिळावा त्याच्यासाठी एक ऑनलाईन प्रवेश केंद्र सुध्दा शिक्षण विभागामध्ये सुरु करण्याचे प्रोव्हिजन केलेले आहे. आपले अग्निशमन विभाग आज मिरा भाईंदर शहरामध्ये अनेक २५ माळ्याच्या, २० माळ्याच्या, २२ माळ्याच्या इमारती उभ्या आहेत. त्यांच्यासाठी आपल्याकडे अग्निशमन यंत्रणा कमी पडत असल्यामुळे आपण जवळ जवळ २२ कोटीची तरतुद ठेऊन एक ७० मीटर ऊंचीच ए.पी.एल किंवा टी.टी.एल. टर्न टेबल लॅडर किंवा एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदी करण्याकरिता आपण बजेटमध्ये मंजुर केलेले आहे. त्याचप्रमाणे ह्या शहरातील वाहतुक व्यवस्था सुध्दा एक चांगली करण्यासाठी १२ कोटी रुपये तरतुद केलेली आहे. त्याच्यामध्ये आपण २७ नविन बसेस घेणार आहोत. त्याच्यामध्ये ५ व्हॉल्वो बसेस असणार आणि ह्या शहराची वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्याच्या दृष्टीने एक पाऊल टाकलेले आहे. त्याचबरोबर एक चांगला बस डेपो म्हणजे अद्यावत बस डेपो जवळ जवळ २७ ते २८ करोड रुपयाचा एक बस डेपो चांगला बांधुन आणि त्याच्या करिता आपल्याला १० करोड रुपये जागतिक बँकेकडून अनुदान सुध्दा उपलब्ध करुन मिळणार आहे. अद्यावत बस डेपो मिरा भाईंदर महापालिकेचे एक उभारण्याचे प्रयत्न करणार आहोत. याच बरोबर पं. भारतरत्न भिमसेन जोशी हे आपले हॉस्पीटल आहे त्या हॉस्पीटलमध्ये चौथ्या मजल्यावरती अतिदक्षता विभाग आणि एक चांगला शस्त्रक्रिया विभाग उभारण्याकरिता आपण एक बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेली आहे तसेच मिरारोडचे आपले जे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय तिथे ७ डायलेसिस मशीन उपलब्ध केल्या आहेत म्हणून त्या कमी पडत असल्यामुळे स्थायी समितीच्या सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आपण तिथे आणखीन ३ डायलेसिस मशीन उपलब्ध करुन देण्याकरिता तरतुद ठेवलेली आहे. महिला बालकल्याण समिती अंतर्गत सुध्दा भरीव तरतुद ठेवलेली आहे. आणि ह्या तरतुदीमध्ये महिलांना स्वावलंबी करण्याकरिता तरतुद ठेवलेली आहे. त्याचबरोबर नविन योजना आपण सुरु करतो मुलींचा जो जन्मदर हा घटत चाललेला आहे हा वाढविण्याकरिता एक चांगला उपक्रम सुकन्या योजना आपण राबविणार आहोत. त्याचे धोरण लवकरात लवकर आपल्या महासभेमध्ये येईल. त्यावेळी आपण ठरवू या तर त्याची पण प्रोव्हिजन आपण करुन ठेवलेली आहे. महिलांना जे कॅन्सर होतात ह्या कॅन्सरच्या उपचारासाठी सुध्दा चांगला अर्थसहाय्य ठेवलेला आहे. दिव्यांग व्यक्ती करिता सुध्दा आपण चांगला बजेट ठेवलेला आहे. आणि आपण यांना एक स्टॉल देण्यासाठी मागच्या महासभेत आपण त्याचे धोरण ठरवले. गटनेत्यांच्या मिटींगमध्ये ते धोरण फाईनल करुन १ एप्रिलपासून त्याला सुरुवात करण्याकरिता आपण चांगल बजेट ठेवलेले आहे. या शहरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्यावरती दिवाबत्ती तिथे लाईट्स आहेत. त्याचे जे बील येते हे बील खुप जास्त असल्यामुळे एल.ई.डी. लाईट वापरुन हे बील कमी करण्याकरिता एक आपण चांगला बजेट ठेवलेला आहे. आणि एक सौर ऊर्जा सोलर इलेक्ट्रीसीटी याच्यासाठी सुध्दा आपण एक चांगला बजेट ठेवलेला आहे. अशाप्रकारे एक चांगला बजेट चांगला अर्थसंकल्प "सबका साथ सबका विकास" ही दृढ संकल्पना मा. नरेंद्र मोदी साहेबांची जी आहे ती अस्तित्वात आणून एक चांगला बजेट ह्या शहराला आपण सादर करतो. मेरा देश बदल रहा है। मेरा शहर बदल रहा है अशी एक चांगली संकल्पना करुन हे बजेट सादर केलेले आहे. मी सगळ्यांना आव्हान करतो की आपण हे बजेट मंजुर करावे आणि प्रशासनाला सुध्दा एक माझी विनंती आहे की ह्या बजेटचे इम्पलीमेंटेशन करण्याकरिता सुध्दा त्यांनी एक सकारात्मक पाऊल टाकावे आणि आपण जे माझे निवेदन ऐकून घेतलं त्याबद्दल धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**मा. महापौर :-**

सभेचे कामकाज सुरु करावे.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौरांना माझी विनंती आहे की दरवर्षी आपण महापालिकेमार्फत डायरी प्रत्येक नगरसेवकांना व इतरांना देतो तर ती एक चांगली डायरी ह्यावर्षी आपण बनवली आहे. तर याचे अनावरण मी महापौरांच्या

हस्ते करतो. ही डायरी एप्रिल टू मार्च आहे. म्हणून ॲडव्हान्समध्ये आपण ते करतो. एक चांगली डायरी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचबरोबर सर्व नगरसेवकांना बजेटची बॅग येणार आहे.

**मा. महापौर :-**

सभेचे विषय सुरु करावे.

**राकेश शहा :-**

मा. महापौर मॅडम मेरा एक निवेदन है यह "ज" का प्रस्ताव और मेरा १०६ नंबर का विषय है। दोनो एक ही है। तो इसी विषय पे चर्चा हो जाए ऐसी मेरी विनंती है।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम जसे राकेश शहा ने असे सांगितले त्याप्रमाणे सभागृहाने ह्या गोष्टीचा विचार करावा. जुबेरचे पण तसेच प्रस्ताव आहेत. ते दोन्ही प्रस्ताव प्रत्येक ठरावाच्या वेळी त्याच्यावर चर्चा व्हावी म्हणजे शेवटी परत ह्याच्यावर वेळ जाणार नाही. एकदा मूळ बजेटला सभागृहाने मान्यता दिली की नंतर झालेल्या चर्चेचा काही उपयोग होत नाही. चर्चा होते दुरुस्ती होत नाही. तुम्हीही विनंती मी पण सांगतो त्यांनी क्लब करायला संमती द्यावी. गिताजीची पण सुचना आहे त्यांना पण विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्पावर चर्चा घडवून आणण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सभेमध्ये "ज" च्या प्रस्तावाची तरतूद नसते. त्या सभेमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा करायची अशी तरतूद करण्यात आलेली आहे. ह्या माध्यमातून ज्या प्रकारे विषय देण्यात येतात त्याच्यामध्ये कुठलाही बदल घडवता येत नाही. स्थायी समितीने जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तो आज मा. महापौरांकडे सादर केला. बदल घट किंवा वाढ करायची असल्यास ती परत स्थायी समितीकडे पाठवायला पाहिजे असा नियम आहे. मात्र "ल" अन्वये पुरक घोषणामध्ये "ल" अन्वये प्रस्तावित केलेल्या विषयावर घट किंवा वाढ कुठल्याही लेखाशिर्षकांतर्गत अर्थसंकल्पाच्या लेखाशिर्षकामध्ये करायची असल्यास त्याला तशी तरतुद आहे. म्हणून मा. महापौर मॅडम सभागृह नेत्यांनी जो विषय इथे मांडला १०१ क्रमांक विषय असेल अग्निशमन विषयचा पहिला विषय १०६ क्रमांक विषय "ज" ल च्या अन्वये आहे. तर ती चर्चा करत असताना आम्ही आमच्या ठरावामध्ये जे काही बदल देऊ किंवा बदलीचे जे काही सुझाव असतील ते तुम्हाला मान्य करायला लागतील. तर एकत्र चर्चा करणे शक्य आहे. कारण ह्याच्या बरोबर सन्मा. सदस्य राकेश शहानी त्यांचा "ज" चा प्रस्ताव दिलेला आहे. गिताजी ह्यांनी ही "ज" चा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांना बदल करायचा आहे की नाही त्याची जाणीव मला नाही. आम्हाला आमच्या सुचना अंदाजपत्रकामधले बदल आम्हाला घडवून आणायचे आहेत. तुम्ही परवानगी दिली तर आम्ही करु. "ज" चा विषय चर्चेमध्ये घेऊ शकता. "ज" च्या अनुक्रमांकाप्रमाणे.

**रोहिदास पाटील :-**

आमचा ठराव ज्यावेळी होईल चर्चा होईल ठराव होईल. तुमचा पण ठराव होणारच ना. तुमचा ठराव घेऊन सुचना घेऊन आम्ही दिलेला ठराव आमचा होईल. तुम्ही दिलेला तुमचा ठराव होईल. आमची सभागृहाला एवढी विनंती होती की नंतर कायद्यानुसार अंदाजपत्रकाला मंजुरी दिली की नंतर जी चर्चा होईल, नोंद होईल, दुरुस्ती होणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

आमच्यामध्ये ती दुरुस्ती होईल. "ल" अंतर्गत जो दिलेला आहे त्याच्यामध्ये आम्ही दुरुस्ती करु. खंड आय मध्ये तुम्हाला करता येत नाही. तसे मा. महापौरांनी सचिवांना आदेश करावे. खंड आयची चर्चा झाली त्याच्यावर तुम्ही तुमचा ठराव मांडला. "ज" चा त्याच विषयामध्ये परत विषय अनुक्रमांकाप्रमाणे वरती घेता येतो.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब आपण हा जर "ल" व्यवस्थित वाचला तर त्याच्यामध्ये काय सांगितले जाते बघा. प्रस्ताव ज्या कोणत्याही सभेत अशा अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार चालू असेल अशा सभेत मांडता येणार नाही. किंवा त्यावर चर्चा करता येणार नाही. मात्र असा प्रस्ताव खंड आय अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सभेच्या नोटिशीत किंवा खंड "ज" अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या पूरक घोषणेत तशी घोषणा असल्यास विनिर्दिष्ट करण्यात आला असेल तर असे त्यांनी सांगितलेले आहे. तुम्ही काय सांगता की आता ह्याच्यात बदल करता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला "ज" अन्वये करता येतो.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही परत नीट वाचा.

**जुबेर इनामदार :-**

तातडीच्या प्रसंगी मागणीवरुन बोलवलेल्या सभेत कोणत्याही सभेतील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावरील चर्चेच्या वेळी ज्या कामकाजासाठी तातडीची सभा बोलावण्यात आली आहे त्या कामकाजाशी किंवा यथास्थिती अर्थसंकल्पीय अंदाजाशी ज्याचा प्रत्यक्षपणे संबंध नाही असे कोणतेही कामकाज चालवता येणार नाही. असा कोणताही मुळ प्रस्ताव मांडता येणार नाही. किंवा चर्चा करता येणार नाही. आणि स्थायी समितीने जे कर लादण्याचे योजले आहे त्या करात किंवा परिवहनचे जे भाडे किंवा आकार बसवण्याचे योजले आहे त्या भाड्यात किंवा आकारात ह्यापुढे कोणताही बदल किंवा अर्थसंकल्पीय अंदाजाच्या खर्चाचा कोणत्याही बाबतीत त्यामुळे वाढ किंवा घट होईल असा कोणताही प्रस्ताव ज्या कोणत्याही सभेत अशा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार चालू असेल असे सभेत मांडता येणार नाही किंवा त्याच्यावर चर्चा करता येणार नाही. मात्र असा प्रस्ताव खंड आय अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवेच्या नोटीसीत किंवा खंड "अ" आयमध्ये मूळ अजेंडा जो होता तसे काय नमूद असते तर आपल्याला करता आले असते. त्याच्यात नाही मात्र असा प्रस्ताव खंड आय अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवेच्या नोटिसीत किंवा खंडचा प्रसिध्द करण्यात आलेला पुरक घोषणेत तशी घोषणा असल्यास विनिर्दिष्ट करण्यात आला असेल तर किंवा तहकुब सभेच्या बाबतीत खंड म हा तहकुब सभेचा विषय झाला त्याच्यामध्ये "ल" स्पष्ट बोलतो की तुम्हाला त्याच्यामध्ये "ल" स्पष्ट बोलतो की तुम्हाला त्याच्यामध्ये जो काही बदल करायचा असेल. तो तुम्ही करु शकता. त्याला तुम्हाला पुरक घोषणाच्या माध्यमातून "ज" च्या माध्यमातून हा विषय तुम्हाला दिला पाहिजे. आणि तो अधिकार माझा आहे. उपविधीचा अधिकार आहे म्हणून आपण काय करु या. तुमचा १०१ आणि आमचा १०६ करता येईल. मात्र तशी घोषणा मा. महापौरांनी ऑन द हाऊस करावी. सभागृहाच्या मंजुरीने अनुक्रमांक वरती करु शकतो. १०१, १०६ घ्या आणि त्यांचा जो असेल तो घ्या. गिता मॅडमचा असेल तो घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की त्यांनी आता जे "ल" कलम वाचलेले आहे प्रकरण २ मधले त्याच्यामध्येच म्हटलेले आहे की अर्थसंकल्पाचा जो मुळ प्रस्ताव आहे जे आय मध्ये डिक्लेर केलेले आहे ते ॲज इट इज तुम्हाला कोणालाच बदल करता येत नाही. त्यामुळे तुम्हाला जरी चर्चा करायची झाली किंवा जो काही प्रस्ताव मांडायचा असेल तर तो तुम्हाला "ज" खाली देणे अपेक्षित आहे. त्यामुळे मी जे १०१ नंबरचे प्रकरण पुकारले आहे त्याच्यावर तुम्हाला चर्चा करायची असेल किंवा जे काही बदल सुचवायचे असतील त्याचा प्रस्ताव मांडायचा असेल त्याच्यासाठी तुम्ही जो "ज" चा प्रस्ताव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये मर्ज करुन घ्यावा लागतो.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे. तुमच्या प्रकरणाचे अनुक्रमांक बदलले ना १०१ प्रकरण वरती आणू शकता ना. तुम्हाला उपविधीचे अधिकार दिलेले आहेत.

**प्र. नगरसचिव :-**

पिठासीन अधिका-यांच्या मान्यतेने ते करु.

**जुबेर इनामदार :-**

सांगताना तसे सांगावे लागेल प्रकरण क्र. १०१.

**प्र. नगरसचिव :-**

मी वाचन तसेच करीन.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय प्रकरण क्र. १०१, प्रकरण क्र. १०६, प्रकरण क्र. १११ और प्रकरण क्र. ११६ चारो एक साथ में ले लिजीए।

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, **अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ११९, ठराव क्र. १०२)** मा. पिठासीन अधिका-यांनी मान्यता दिल्याप्रमाणे आजच्या सभेस प्राप्त झालेल्या 'ज' आणि 'ल' खालील प्रस्ताव आहेत. पुरक घोषणामध्ये ज्याची घोषणा केलेली आहे.

दि. २३/०३/२०१८ रोजी त्यापैकी प्रकरण क्र. १०६ सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दि. २१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ 'ज' ल अन्वये प्रस्ताव तसेच प्रकरण क्र. १११ सन्मा. सदस्य श्री. राकेश शहा यांचा दि. २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेले प्रस्ताव अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक अनुसुची 'ड' प्रकरण २ ''ल'' 'म' अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव तसेच प्रकरण क्र. ११६ सन्माननीय सदस्या श्रीम. गीता जैन यांचा दि. २२/३/२०१८ रोजीचे पत्रान्वये दिलेला प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ''ड'' मधील प्रकरण १ 'ड' व 'ल' अन्वये चर्चा करण्यासाठी प्रस्ताव विषय पटलावर घेणे हे चारही प्रकरणांवर एकत्र चर्चा होणार आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 3592.93 | | 3307.00 |
| एकूण खर्च | | 1615.93 | | 3283.15 |
| अखेरची शिल्लक | | **1977.00** | | **23.85** |

**अरविंद शेट्टी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

१०६ चा माझा 'ज' चा प्रस्ताव मी मागे घेतो.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजी प्रकरण क्र. ११९, ठराव क्र. १०२ अन्वये स्थायी समितीने प्रस्तावित केले आहे. अंदाजपत्रक सादर करताना अग्निशमन विभागाच्या वार्षिक कामकाजाबाबत कोणतीही प्रस्तावना दिलेली नाही. पुढील वर्षी सदरचा प्रस्ताव सादर करताना विभागाने वार्षिक कामकाजाबाबतचा सविस्तर तपशिल महासभेपुढे सादर करावा तसेच अर्थसंकल्पात जमा व खर्चाच्या लेखाशिर्षकातील आयुक्तांनी सुचवलेले निधीमध्ये बदल न करता १५.८५ लाख शिल्लकीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाला मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१ घ्या विषयाचे वाचन केल्यानंतर दोन ठराव प्राप्त झालेले आहेत त्यामध्ये पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी. अनुमोदक श्री. अरविंद शेट्टी. दुसरा ठराव सुचक श्रीम. निलम ढवण, अनुमोदक श्री. जुबेर इनामदार प्रथम मी दुसरा मतदानास टाकतो. सुचक श्रीम. निलम ढवण यांच्या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांच्या यांच्या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठरावाच्या बाजुने ५५, विरोधात २५, तटस्त ० इतकी मते पडलेली आहेत सुचक प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमतांने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०१ :-**

**अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ११९, ठराव क्र. १०२)**

**ठराव क्र. ९९ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 3592.93 | | 3307.00 |
| एकूण खर्च | | 1615.93 | | 3283.15 |
| अखेरची शिल्लक | | **1977.00** | | **23.85** |

सूचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदकः- श्री. अरविंद शेट्टी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | शाह रिटा सुभाष | १० | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | निरंक |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | सौंस नीला बर्नाड | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | रावल मेघना दिपक | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | अरोरा दिपीका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २८ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३१ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३४ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३५ | भूप्तानी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३८ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४३ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ५० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **५३** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| **५४** | **भोईर गणेश गजानन** | | | |
| **५५** | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२, **वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत . (मा. स्थायी समिती सभा दि . १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . १२०, ठराव क्र. १०३)** प्रकरण क्र. १०७, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ (ज) (ल) अन्वये प्रस्ताव, प्रकरण क्र. ११२, सन्मा. सदस्य श्री. राकेश शाह यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- वृक्ष प्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकीय अनुसुची ''ड'' प्रकरण २ ल (म) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव. (मा. स्थायी सामिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. १०३) प्रकरण क्र. ११६, सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ''ड'' मधील प्रकरण एक (ज) व (ल) अन्वये चर्चा करण्यासाठी प्रस्ताव विषय पटलावर घेणेबाबत.

**सुशिल अग्रवाल :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले ''वृक्षप्राधिकरण'' विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 265.00 | | 625.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तांतरण | | 492.00 | | 247.00 |
| एकूण खर्च | | **757.00** | | **872.00** |

**गणेश भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. स्थायी समिती सभापती ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी थोडक्यात दिवाळीचा आनंद भाषणामध्ये दिला. दिवाळी म्हणजे आनंदाचा सण. परवा येतोय याचा आनंद तुम्ही आम्हाला दिला खरा मला एक छोटस गाण इथे आठवतं. कैसे दिवाली मनाई है लाला अपना तो सारा पुरा बारा महिना दिवाला अर्थसंकल्प प्रस्तावाचा साहेब तुम्ही अतिशय सुंदर केली शब्द रचना ही अतिशय चांगली होती तुमची असावी कारण बेलवटे साहेब चांगले आहेत. मोठे आकड्यावर नाचले त्यांनी मा. आयुक्त महोदय वृक्षप्राधिकरण विषय आमच्या मुळ बजेटमध्ये सुध्दा वृक्षप्राधिकरण म्हणजे 'अ' बजेट मुळ बजेट म्हणतात. त्याच्यामध्ये सुध्दा वृक्षप्राधिकरणचे लेखाशिर्षाखाली आणि वृक्षप्राधिकरण समिती एक स्वतंत्र वैधानिक समिती आहे. आणि त्याचे अध्यक्ष स्थायी आयुक्त तुम्ही स्वतः बसता खरं तर त्याचे अधिकार त्यालाच प्राप्त असायला पाहिजे ह्या मताचा आहे. कारण हा विषय वृक्षप्राधिकरणाचा आणि वृक्ष प्राधिकरण

समितीवरच ह्या विषयावर त्या अंदाजपत्रकावरच बोलले पाहिजे पान क्र. ४२ मुळ बजेटवर उद्यान विभाग त्याच्यामध्ये स्थायी आस्थापना म्हणजे वृक्षप्राधिकरणाला लागणारी स्थायी अस्थापना ती आम्ही मुळ बजेटमध्ये ठेवली. अस्थायी आस्थापना ही त्याच्यामध्ये माती, शेणखत सफेद रेती पुरवठा करणे तर माती शेणखत हा सगळा जो विषय आहे तो वृक्ष प्राधिकरण समितीचा आहे. वृक्षप्राधिकरण विभागाचा आपल्याकडे स्वतंत्र दोन अधिक्षक पण नेमले आहेत. तीनशे पेक्षा जास्त मजुर त्याच्यामध्ये काम करतात. सगळे काही मुळ बजेटमध्ये त्याचा का स्थलांतरीत करण्यात आला. याच्यावरती कदाचित आमचे ही लक्ष गेले नाही. पण तुमचा ह्या मुद्दयावरती लक्ष वेधू इच्छितो की, ह्याच्यामध्ये बदल करणे गरजेचे आहे. साहेब खत, किटकनाशके, बुरशी नाशके हे सगळे काही मुळात वृक्षप्राधिकरणचे विषय आहेत. मजुर पुरवठा उद्यान, मैदाने, दुभाजक, निगा देखभाल दुरुस्ती याचा विषय तसेच वाहन भाडे आता वाहन विभाग आपल्याकडे आहे. एक स्वतंत्र वाहन विभाग आहेत. त्याच्यामध्ये दोन अधिकारी आहेत. चिंतामण शिंदे यांचा काही जुना अनुभवी माणूस ह्याच्यामध्ये काम करतात आणि ह्या विषयावर स्थायी समितीच्या चर्चेमध्ये सुध्दा आम्ही घेतला होता. आणि मात्र तो वाहन विभाग इथे असताना हा प्रत्येक हेड खाली वाहन विभाग म्हणजे त्याच्यामुळे होते काय साहेब अंदाजपत्रक अर्थसंकल्पावर आपल अस नको त्या पध्दतीने कागदावर फुगत चालला ही काम त्याच विभागाने करायची त्याचे उत्तर ज्या विभागाने दिले त्यांनीच दिले पाहिजे. खेळणी बेंचेस फिटींग दुरुस्ती मान्य करु शकते की पी.डब्ल्यू.डी. करेल. टँकरने पाणी पुरवठा करणे तो ही परत मुळ बजेटमध्ये साहेब हे सर्व काही विषय म्हणजे लेखाशिर्षक मी आज वाचून दाखवतो. खर तर हे वृक्षप्राधिकरण समितीचीच आहे. तसेच पान क्र. ४७ परत पान क्र. ४९ उद्यान विभाग सभापती महोदय, परत उद्यान विभाग तिथे आला त्याच्यामध्ये ही परत नविन खेळणी, बेंचेस, साहित्य बसवणे तो एक विषय उद्यान विभागाचा असताना मूळ बजेटमध्ये जे वैधितता उद्यान बायो डायलोसिटी तो असायला पाहिजे तो विषयच वृक्षप्राधिकरणचा आहे. तो ही मूळ बजेटमध्ये सेंद्रीय खत, गांडूळ खत तयार करणे हा मूळ बजेटमध्ये कशाला ठेवला कारण समजत नाही तो वृक्षप्राधिकरणमध्ये गेला पाहिजे आणि साहेब आर.जी. क्षेत्र उद्याने नर्सरी विकसित करणे किंवा त्याच्यामध्ये लॅन्डस्केपींग करणे, लॅन्डस्केपींग विकसित नर्सरी विकसित करायची काम सगळे काही वृक्षप्राधिकरण समितीचीच असतात त्यांना स्वतंत्र अधिकार नाही दिला तर ते काम होणार कशी. कारण त्यांना साहेब कुठलाही बरेच काही सदस्य त्यांच्याकडे जात असतात. वृक्ष प्राधिकरण हा एक हौसेचा विषय आहे. हौस असते कोणाला प्रत्येकाला मला वाटते साहेब झाडे जगवावी, उगवावी हा एक छंद असतो. त्यांना ते अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता ते बाबा आमच्या अधिकारातच नाही. आम्ही कसे करणार. तुम्ही मध्ये खेपा घाला. हेड ऑफीसच्या सार्वजनिक बांधकामाकडे जाव लागतो आणि त्याच्यानंतर त्यांची ती पध्दत कामाची एक वेगळ्या शैली पध्दतीने चालते. कुठे तरी आणि साहेब वृक्षप्राधिकरण हा तुमचा अधिकार असल्यामुळे स्वतंत्र अधिकार तुमचा त्याच्यासाठी तुम्ही बसता म्हणजे प्रत्येक विषय तुमच्या माध्यमातून सुटसुटीतपणे चालू झाला पाहिजे. याच्यामुळे साहेब एक ह्या शहराची सुंदरता वाढेल. सुशोभिकरण करता येईल. हिरवीगार शहर आपल्याला करायचं असेल तर त्याला एक सोयीस्कर माध्यम तयार करुन देणे गरजेचे आहे. हा विषय मुद्दामुन ह्या "ज" च्या माध्यमातून आणलेला आहे. हा जो त्याच्यामध्ये आम्ही काही कुठे अंदाज निधीमध्ये काही फरक आयुक्तांनी जे सुचविलेले आहे त्याच्यामध्ये केले नाही. फक्त इतकच आहे की हे जे काही लेखाशिर्षक आहे साहेब ते वृक्षप्राधिकरण समितीकडे वर्ग झाले पाहिजेत. फरक करताना एकच केलेले आहे आर.जी. क्षेत्र, उद्याने, नर्सरी विकसित करण्यासाठी तुम्ही एक कोटी रुपये तरतुद आयुक्तांनी केली होती. आम्ही त्यांच्या जागी साहेब ती दोन कोटींची केलेली लॅन्डस्केपिंगसाठी आमची स्वतःची मागणी असता आमच्या कडच्या क्षेत्राच्या उद्यानामध्ये तुम्ही काम करुन द्या ते होत नाही किंवा केली जात नाही कारण त्यांना तरतुद उपलब्ध नसते. त्याअनुषंगाने ते कमी केले. आम्ही त्याला मॅनेज केले. नविन उद्याने बांधकाम, दुभाजक, सुशोभिकरण करणे ११ कोटीचे त्याला आम्ही ९ कोटी केलेले आहे. इथे आम्ही निधी वाचविलेला आहे आणि ती दुसऱ्या बाजूला वर्ग केलेली आहे. पुढच्या मुळ बजेटमध्ये जेव्हा चर्चा होईल तेव्हा तुम्हाला त्याची माहिती देऊ. विषय कसा आहे साहेब आयुक्तांनी प्रस्तावित केलेला स्थायी समितीकडे अंदाजपत्रक स्थायी समितीने ३ दिवस मॅरेथॉन मिटींग घेतली. चर्चा झाली खरतर सभापती महोदय आपल्याला त्या मिनिट्स ठेवायला पाहिजेत. ती अधिकृत बैठक होती. पुढच्या वेळी हा नविन पायंडा टाकला पाहिजे. ती चर्चा तिथे होते त्याची रेकॉर्डींग व्हावी कारण झालं अस साहेब आयुक्तांनी दिला अर्थसंकल्प स्थायी समितीने प्रस्तावित केला. शहराच्या आमदारांनी हे प्रस्तावित केले आणि शेवटी तो महासभेमध्ये आमच्याकडे चर्चेला आला. कारण स्थायी समितीमध्ये आम्ही बरेच काही विषय नव्हते हे अंदाजपत्रकामध्ये आम्हाला बघायला मिळाले. रेकॉर्डींग नसल्यामुळे आम्ही ते सिध्द करु शकत नाही म्हणून मी चर्चा जास्त करत नाही मात्र हा पुढच्या वेळी सचिव महोदय स्थायी समितीची मॅरेथॉन बैठक घेतली जातात दोन दिवस, ३ दिवस चर्चा

सत्र त्याची रेकॉर्डींग ठेवा. लाइव्ह केल तर अतिउत्तम. आमची तयारी आहे. त्याच विषयावर मी माझा ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजी प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. १०३ अन्वये स्थायी समितीने प्रस्तावित केले आहे. "अ" अंदाजपत्रकामध्ये लेखाशिर्ष उद्यान विभाग १० पान क्र. ४२ अनु. क्र. १) स्थायी आस्थापना १५०.०० लाख अनु. क्र. २) अस्थायी आस्थापना/सुरक्षा रक्षक ३५०.०० लाख अनु क्र. ३) माती / शेणखत / सफेद रेती इ. पुरवठा करणे १००.०० लाख अनु क्र. ४) खते / किटकनाशके ३.०० लाख अनु. क्र. ५) मजूर पुरवठा ५००.०० लाख अनु क्र. ७) नवहीन खेळणी / बेंचेस ५.०० लाख अनु क्र. ८) टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे ५०.०० लाख उद्यान विभाग पान क्र. ४९ अनु. २) नवीन खेळणी /बेंचेंस १००.०० लाख अनु. क्र. ५) सेंद्रीय कंपोस्ट गार्डन खत ५.०० लाख अनु. क्र. ८) आर.जी. क्षेत्र / लॅन्डस्केपींग उद्याने १००.०० + १००.०० = २००.०० लाख (एकूण १४६३.०० लाख) उल्लेखित लेखाशिर्ष वृक्ष प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकाकडे अस्तित्वात असलेल्या व नव्याने प्रस्तावित केलेल्या लेखाशिर्षात वर्ग करण्यात यावे.

वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रकामध्ये मनपा उत्पन्नातून वर्ग करावयाची रक्कम आयुक्तांचा अंदाज ३६०.०० लाख अधिक १४६३.०० लाख एकूण १८२३.०० लाख प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच, या अंदाजपत्रकात अस्थायी आस्थापना ३५०.०० लाख खेळणी/बेंचेस इतर साहित्य पुरवणे १००.०० लाख, सेंद्रीय खते/गांडूळ खते तयार करणे ५.०० लाख, आर.जी. क्षेत्र उद्याने विकसित करणे १००.०० लाख नवीन लेखाशिर्षक बनवण्यात यावे. सदरचे "अ" अंदाजपत्रकामधून वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रकामध्ये स्थलांतरीत करण्यात यावे. वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक अनु. क्र. ११) मजूर पुरवठा वृक्षारोपण निगा यासाठी ८.१० लाख रुपये अंदाजित तरतुद करण्यात येत आहे व उर्वरीत लेखाशिर्षात आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या निधीच्या अंदाजात कोणताही बदल न करता, वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारीत सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

जुबेर साहेब तुम्ही १०७ खाली म्हणालात परंतु तो आपण क्लब केलेला आहे विषय त्यामुळे १०२ आणि १०७ असा एकत्र करुन तुमचा तो ठराव आलेला आहे असे ग्राह्य धरण्यात येत आहे. कारण आपण ह्यापूर्वी घोषित केलेले आहे की सगळे प्रकरण एकत्र वाचन करुन त्यावरती आपली चर्चा आणि त्याप्रमाणे ते प्रस्ताव होणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब तुम्ही खंडामध्ये ठेवलेला आहे. प्रकरण त्याच्यामध्ये तुम्हाला कुठला बदल करता येत नाही.

**प्र. नगरसचिव :-**

तो एकत्रच येणार १०२, १०७ असे प्रकरण एकत्र येणार.

**जुबेर इनामदार :-**

पण माझा "ज" चा येईल.

**प्र. नगरसचिव :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण नंबर तुम्ही टाकता. तुम्ही १०७ तुम्हाला दिलेले आहे. सचिवाने तिथे काय करायचे ते करावे. बदल करायचा असेल तर करावे पण माझा १०७ चा आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२ आणि १०७ असे एकत्र केल्यानंतर त्या प्रकरणावरती दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव डॉ. सुशिल अग्रवाल, अनुमोदन श्री. गणेश भोईर. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात

असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक डॉ. सुशिल अग्रवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक डॉ. सुशिल अग्रवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५५, विरोधात २५, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. डॉ. सुशिल अग्रवाल यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०२ :-**

**वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२०, ठराव क्र. १०३)**

**ठराव क्र. १०० :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले "वृक्षप्राधिकरण" विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 265.00 | | 625.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | | 492.00 | | 247.00 |
| एकूण खर्च | | **757.00** | | **872.00** |

सूचक :- डॉ. सुशिल अग्रवाल अनुमोदक:- श्री. गणेश भोईर

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | शाह रिटा सुभाष | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | सोंस नीला बर्नाड | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | रावल मेघना दिपक | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अरोरा दिपीका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २८ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३१ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३४ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३५ | भूप्तानी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३८ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४३ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ५१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ५२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५३ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५४ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५५ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३, **शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२१, ठराव क्र. १०४)**, प्रकरण क्र. १०८, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ (ज) (ल) अन्वये प्रस्ताव., प्रकरण क्र. ११३, सन्मा. सदस्य श्री. राकेश शाह यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकीय अनुसुची ''ड'' प्रकरण २ ल (म) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव. (मा. स्थायी सामिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १२१, ठराव क्र. १०४), प्रकरण क्र. ११६, सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ''ड'' मधील प्रकरण एक (ज) व (ल) अन्वये चर्चा करण्यासाठी प्रस्ताव विषय पटलावर घेणेबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले ''शिक्षण'' विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | **2017-18** (सुधारित अंदाज) | | **2018-19** (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 519.00 | | 763.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तांतरण | | 1178.20 | | 966.15 |
| एकूण खर्च | | **1697.20** | | **1729.15** |

**दिपीका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण क्र. १०८ ''ज'' प्रस्ताव मी मागे घेतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजी प्रकरण क्र. १२१, ठराव क्र. १०४ अन्वये स्थायी समितीने प्रस्तावित केले आहे. अर्थसंकल्पात जमा व खर्चाच्या

लेखाशिर्षकातील आयुक्तांनी सुचवलेले निधीमध्ये बदल न करता अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाला मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदन श्रीम. दिपीका अरोरा. दुसरा ठराव सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर, अनुमोदन श्री. जयंतीलाल पाटील. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक मदन उदितनारायण सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. मदन उदितनारायण सिंह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५५, विरोधात २५, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. मदन उदितनारायण सिंह यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०३ :-**

**शिक्षण विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि . १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . १२१, ठराव क्र. १०४)**

**ठराव क्र. १०१ :-**

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले "शिक्षण" विभागाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 519.00 | | 763.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | | 1178.20 | | 966.15 |
| एकूण खर्च | | **1697.20** | | **1729.15** |

सूचक :- श्री. मदन उदितनारायण सिंग अनुमोदक:- श्रीम. दिपीका अरोरा

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | शाह रिटा सुभाष | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | सोंस नीला बर्नाड | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | रावल मेघना दिपक | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अरोरा दिपीका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २८ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३१ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३४ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३५ | भूप्तानी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३८ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **४२** | **भोईर जयेश भानुदास** | | | |
| **४३** | **शेट्टी गणेश गोपाळ** | | | |
| **४४** | **थेराडे संजय अनंत** | | | |
| **४५** | **राय विजयकुमार सिस्थन नारायण** | | | |
| **४६** | **विराणी अनिल रावजीभाई** | | | |
| **४७** | **जैन दिनेश तेजराज** | | | |
| **४८** | **गजरे दौलत तुकाराम** | | | |
| **४९** | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| **५०** | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| **५१** | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| **५२** | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| **५३** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| **५४** | **भोईर गणेश गजानन** | | | |
| **५५** | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०४, **परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १०५),** प्रकरण क्र. १०९, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ (ज) (ल) अन्वये प्रस्ताव., प्रकरण क्र. ११४, सन्मा. सदस्य श्री. राकेश शाह यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकीय अनुसुची ''ड'' प्रकरण २ ल (म) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव. (मा. स्थायी सामिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १०५) प्रकरण क्र. ११६, सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ''ड'' मधील प्रकरण एक (ज) व (ल) अन्वये चर्चा करण्यासाठी प्रस्ताव विषय पटलावर घेणेबाबत.

**अश्विन कासोदरिया :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ''परिवहन'' उपक्रमाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | | 6071.83 | | 7365.28 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| परिवहन खर्च | | 6066.70 | | 7343.35 |
| **अखेरची शिल्लक** | | **5.13** | | **21.93** |

**अरविंद शेट्टी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय परिवहनचे बजेट देताना मुळ अंदाजपत्रकामध्ये २०१६-१७ खर्चाच्या बाजूमध्ये १६.६० कोटी रुपये म्हणजे १६ कोटी ६० लाख रुपये खर्च वेगवेगळ्या लेखाशिर्षा अंतर्गत दर्शविण्यात आलेले आहे आणि जमेच्या बाजुला १० कोटी ५१ लक्ष तुट दाखवली आहे. ५ कोटी ६८ लक्ष १२ कोटी गेल्यावर्षी तरतुद करण्यात आली होती. बेलवटे साहेब ६ कोटी रुपये कुठे गेले. २५/१०/२०१५, २०१६-१७ मध्ये रक्कम रु. १२ कोटी १० लाख इतकी नगरपालिका जनरल फंडातुन हस्तांतर करुन सदरची सेवा सुरळीतपणे सुरु ठेवण्यात आलेली आहे. यावर उपाययोजना म्हणून सदरची सेवा नागरिकांना मिळावी म्हणून महापालिकेतून उत्पादनात वाढ करणे कार्यरत आहे. ६ कोटी रुपये कुठे गेले? कोण उत्तर देणार का? पान क्र. ११ साहेब प्रस्तावना मुळ बजेटमध्ये.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे मुळ बजेटमध्ये तुम्ही जे सांगितलेले आहे महापालिका परिवहन सेवा ही अर्थसहाय्य देऊन पुरवलेली परिवहन सेवा आहे. आपल्या पुढे जे बजेट सादर केलेले आहे. परिवहन समितीने ते सादर केलेले बजेट परिवहन विभागाकडून जे आलेले आहे. त्याच्यामध्ये २०१६-१७ चा उल्लेख नाही. २०१७-१८ आणि २०१८-१९ हे तुमचे दोन वर्षाचे दाखवलेले आहे. मागील त्याचे दाखवलेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

गेल्या वर्षामध्ये तरतुद १२ कोटीची होती ना तुम्ही तुट दाखवलेली आहे. ५ कोटी रुपये तुम्हाला तुट भरुन काढायची होती. ६ कोटी रुपये ५ कोटी ६८ लाख रुपये म्हणजे तुमच्याकडे ६ कोटी ३२ लाख रुपये शिल्लक असायला पाहिजे ते कुठे आहेत.

**शरद बेलवटे :-**

साहेब ही तुट भरुन काढण्यासाठीच मुळ बजेटमधून पैसे दिले जातात.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही जमेच्या बाजूमध्ये बस तिकिट.

**शरद बेलवटे :-**

परिवहन विभागाने जे बजेट सादर केलेले आहे आपल्या समारे त्याच्यामध्ये २०१७-१८ चे आणि सुधारित २०१७-१८ चे सुधारित आहे. आणि २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक आणि तुम्ही म्हणत आहेत २०१६-१७. २०१६-१७ हे गेले गेल्या वेळेला त्या बजेटमध्ये तुम्हाला रक्कम दाखवलेली तिथे किती तुट आलेली होती. त्या तुटीचा अहवाल तुमच्या समोर दिलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब २०१७-१८ चे ६ कोटी रुपये कुठे गेले. मी फक्त तेवढच विचारलं २०१६-१७ ला ते पुढे येतील की नाही.

**शरद बेलवटे :-**

साहेब तुमच्या समोरच आहे.

**जुबेर इनामदार :-**

ते शिल्लकमध्ये आले पाहिजे होते म्हणजे तुम्हाला गरज नाही एवढ्या पैशांची परिवहन विभागाला.

**शरद बेलवटे :-**

२०१६-१७ ला साहेब तुट भरून तुट आहे ती........

**जुबेर इनामदार :-**

तुट भरुन काढली बरोबर आहे. तरतूद किती केली होती ह्या वर्षी?

**सुरेश खंडेलवाल :-**

१२ कोटी ठेवलेली होती. जेवढी तुट लागली तेवढी घेतली बाकीचे मुळमध्ये आहे.

**शरद बेलवटे :-**

साहेब त्यावर्षी जमा जी झालेली आहे ती किती आहे. १०५१.९७ लक्ष आणि त्यापेक्षा खर्च जास्त झाला आहे तो मुळ बजेटला दिला.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ११ नबरचे पान बघा.

**शरद बेलवटे :-**

११ नंबरचे पानाचे सांगत आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापालिका परिवहन सेवा २०१६-१७.

**शरद बेलवटे :-**

२०१६-१७ साहेब पान क्र. ५ वरती तुम्ही या आणि बघा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ (अ) नुसार २०१६-१७ मध्ये अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवाबाबतचा तो अहवाल आहे. तो २०१६-१७ चा आहे. तुम्ही २०१७-१८ आणि २०१८-१९ चा हे करत आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे २०१७-१८ तुम्ही दाखवणार की नाही कुठे आहे मी तेच विचारत आहे. परिवहनमध्ये नाही आहे. तुम्हाला पैसे कमी पडले का? तुम्हाला १२ कोटीची गरज तेव्हा नव्हती. मला तेवढेच पाहिजे. तुमच्याकडून १२ कोटीची तरतुद होती. ७ कोटी रुपये लागले. खर्च किती, जमा किती समोर समोर तुम्हीच दिली २०१५-१६ मध्ये १२ कोटीची तरतूद आहे.

**शरद बेलवटे :-**

साहेब १० कोटीची जमा आहे. १६ कोटीचा खर्च आहे. ती तोट्यात चाललेली सेवा आहे. त्याच्यामुळे इकडून त्याला तुम्हाला सबसिडीच द्यावी लागते. तेव्हा ती सुरळीतपणे चालते.

**जुबेर इनामदार :-**

सबसिडी किती दिली १२ कोटी दिली आहे का?

**शरद बेलवटे :-**

२०१६-१७ ला दिलेली आहे. २०१७-१८ ला अजून पर्यंत चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मी २०१६-१७ च बोलतोय मी २०१६-१७ वरच चर्चा करतो.

**शरद बेलवटे :-**

साहेब बजेट चाललय २०१७-१८ चे सुधारित आणि २०१८-१९ साहेब.

**जुबेर इनामदार :-**

२०१७-१८ ला कुठेतरी रिफ्लेक्ट होणार ना. अर्थात महापौर मॅडम हे ६ कोटी कधीच सापडणार नाही. महापौर मॅडम ह्याचे उत्तर माझ्याकडे आहे. हे सहा कोटी सापडणार नाही. आपला विषय असा आहे की गरज नव्हती. १२ कोटीची जी तरतूद ठेवलेली आहे गरज नव्हती.

**शरद बेलवटे :-**

साहेब तुम्हाला माहिती आहे हे सगळ परंतु हे जे बजेट विभागाने जे दिले आहे ते फक्त मागील त्याच्यामध्ये तीन वर्षाचे फिगर त्यांनी दिलेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

कुठल्या विभागाने दिला?

**शरद बेलवटे :-**

२०१७-१८ हा आणि २०१८-१९ चे दिलेले आहेत. ते जर असते तर ॲटोमॅटिकली दिसले असते.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मी तुम्हाला स्पष्ट साधा प्रश्न विचारला की तुम्ही ६ कोटी खाल्ले असे मी बोलत नाही. तुम्हाला गरज नव्हती १२ कोटीची तुम्ही तरतुद ठेवली होती १२ कोटीची. सबसिडी आपण हस्तांतर १२ कोटी केले गरज लागली तुम्हाला ५ कोटी ६८ लाख.

**सुरेश खंडेलवाल :-**

हेच तर मी बोलतो १२ कोटी मधून जेवढे लागले तेवढे घेतले. बाकीचे आहेत तिथेच.

**धृवकिशोर पाटील :-**

२०१६-१७ ला ५ करोड ६८ लाख ९३ हजार ही तूट आलेली आहे. प्रोव्हिजन करुन ठेवली १२ कोटीची. बरोबर आहे प्रोव्हिजन करुन ठेवलेली आहे. ॲक्च्युअल तूट कितीची आहे. ही सहा कोटीची आणि तो तरतुदीचा फिगर आहे आणि तेवढी तरतूद होणार आहे. तेवढीच फिगर इकडे येणार.

**जुबेर इनामदार :-**

खर्च झाले १६६०. ९० लाख रुपये तुम्ही जमेच्या बाजूला बस तिकीट विक्री केली.

**धृवकिशोर पाटील :-**

१० कोटी ९१ लाख.

**जुबेर इनामदार :-**

विद्यार्थी प्रवास, भाडे विना तिकीट वाहनावरील जाहिरात.

**धृवकिशोर पाटील :-**

१० कोटी ९१ लाख ९७ हजार ही जमा आहे.

**जुबेर इनामदार :-**

खर्च झाला १६०० तुम्हाला तुट किती पडली?

**धृवकिशोर पाटील :-**

५ कोटी ६८ लाख.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही तुमच्या अनुदान जो तुम्ही तुमच्याबरोबर मधून देता हस्तांतर करतात त्याच्यामधून तरतूद किती केली होती?

**धृवकिशोर पाटील :-**

ती फक्त प्रोव्हिजन असते १२ कोटीची त्यानी ॲप्रोक्सीमेटली कारण मी त्याच्या आदल्या वर्षीमध्ये १२ कोटी १० लाखाची तरतूद केली होती. आणि म्हणून त्यांनी १२ कोटीची ठेवली होती. ही तरतूद असते हा ॲक्च्युअल बजेट असतो.

**जुबेर इनामदार :-**

मी मान्य करतो म्हणजे याचा अर्थ तरतुद जास्त ठेवली होती. आमचा तोच आरोप आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मागच्या वर्षी १२ कोटी १० लाख रुपये तरतुद ठेवली होती आणि ती खर्च झाली होती. आणि म्हणून त्यांनी ते ॲप्रोक्सीमेटली ठेवला १२ करोड पकडला होता आणि ह्या वर्षी जास्त पैसे जमा झाले दिशाभूल करु नका.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम अजून निर्णय घेणे बाकी आहे. परिवहन सेवा चालवायची तरी कशी. जी.सी.सी. तत्वावर चालवायची की एन.सी.सी. तत्वावर चालवायची ह्या सभागृहामध्ये सताधाऱ्याने जी.सी.सी. तत्वावर चालवा असा ठराव केला आहे. आम्ही विरोधात असताना तेव्हाही एन.सी.सी. तत्वावर चालवा अशी आमची ठाम भुमिका होती. आज परत तोच विषय सभागृहासमोर येणार आहे. येणाऱ्या काळामध्ये एन.सी.सी. तत्वावर चालवावी नाहीतर पालिकेला नको तो आर्थिक भुर्दंड बसणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजी प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १०५ अन्वये स्थायी समितीने प्रस्तावित केले आहे. अर्थसंकल्पात “अ” अंदाजपत्रकातून हस्तांतरण परिवहन व्यवस्थापकाचा अंदाज १३००.०० लाख कमी करुन १०००.०० लाख प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत लेखाशिर्षकात आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या निधीच्या अंदाजात कोणताही बदल न करता परिवहन समितीने मंजूर केलेले सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०४ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. अश्विन कासोदरिया, अनुमोदन श्री. अरविंद शेट्टी, दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र

आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. अश्विन कासोदरिया यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. अश्विन कासोदरिया यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५५, विरोधात २५, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. अश्विन कासोदरिया यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०४ :-**

**परिवहन सेवेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. १०५)**

**ठराव क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ''परिवहन'' उपक्रमाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | | 6071.83 | | 7365.28 |
| परिवहन खर्च | | 6066.70 | | 7343.35 |
| अखेरची शिल्लक | | **5.13** | | **21.93** |

सूचक :- श्री. अश्विन कासोदरीया अनुमोदक:- श्री. अरविंद शेट्टी

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | जैन गिता भरत | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | शाह रिटा सुभाष | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | गोहिल शानू जोरावर सिंह | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | भोईर सुनिता शशिकांत | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | पाटील वंदना मंगेश | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | सोंस नीला बर्नाड | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | रावल मेघना दिपक | १७ | पाटील धनेश परशुराम | |
| १८ | मोकाशी दिपाली आनंदराव | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | अरोरा दिपीका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | अहमद साराह अकरम | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २८ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २९ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३१ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| ३२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३४ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३५ | भूप्तानी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३८ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४० | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४३ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४४ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४८ | गजरे दौलत तुकाराम | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **४९** | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| **५०** | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| **५१** | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| **५२** | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| **५३** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| **५४** | **भोईर गणेश गजानन** | | | |
| **५५** | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०५, **सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण " + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणे बाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ११८, ठराव क्र. १०१)** प्रकरण क्र. ११०, सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक २१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण २ (ज) (ल) अन्वये प्रस्ताव., प्रकरण क्र. ११५, सन्मा. सदस्य श्री. राकेश शाह यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- सन २०१७-१८ चे सुधारीत व सन २०१८-१९ चे मुळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकीय अनुसुची "ड" प्रकरण २ ल (म) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव. (मा. स्थायी सामिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. ११८, ठराव क्र. १०१) प्रकरण क्र. ११६, सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांचा दिनांक २२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण एक (ज) व (ल) अन्वये चर्चा करण्यासाठी प्रस्ताव विषय पटलावर घेणेबाबत.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने मुळ बजेटला सुरुवात झालेली आहे. सभापती महोदय यांनी निवेदन केल चांगला हुशार माणूस आहे. १९९५ पासून मी त्यांना राजकीय क्षेत्रात या बजेट कॉपीमध्ये महापौर मॅडम अक्षम्य चुका आहेत. म्हणजे आम्हाला बजेट नक्की कुठला दिलेला आहे. मुळ अंदाजपत्रक कुठच आहे. २०१८-१९ चे आहे की २०१७-१८ चे आहे सभापतींच्या निवेदनामध्ये राष्ट्रपुरुषांची नाव ज्याच्या नावाने ह्या शहरामध्ये वास्तु उभ्या आहेत त्यांची नाव आपण व्यवस्थित लिहू शकत नाही. पेज नं. बी सभापतींचे निवेदन भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय अशा बऱ्याच आहेत जरा मुळ बजेटकडे वळू या. सबका साथ सिर्फ मेरा विकास शहर से लेटर हुए गायब कैसे बना खास बऱ्याच गोष्टींचा उल्लेख झाला साखरपुड्याचा पत्ता नाही. मुलांची नावे ठेऊन झाली. मेट्रो स्थानकांचे नाव ह्या महासभेने ठेवली. मेट्रो स्थानकाला मंजुरी दिली. आणि कालच्या एम.एम.आर.डी.ए च्या बजेटमध्ये २०१८-१९ सालासाठी ह्या मिरा भाईंदर शहरासाठी एक रुपयाची तरतुद नाही. किती शरमेची गोष्ट आहे. आपण काही करणार आहोत की नाही इथून गेलेले लोक प्रतिनिधी करतात काय?

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम यह बजेट का विषय चल रहा है। यह मेट्रो का विषय ले रहे है। यह आज का बजेट का विषय नही है।

**अनिल सावंत :-**

शहराच्या हितामधला विषय आहे.

**मा. उपमहापौर :-**

एका पत्रकाराने लावलेला शोध आहे. ज्याअर्थी एम.एमआर.डी.ए. ने या शहराचा डी.पी.आर बनवायला घेतला. ज्याअर्थी ह्या शहरामध्ये त्या सर्व हालचाली सुरु झाल्या. ज्याअर्थी एम.एम.आर.डी.ए. ने पत्र पाठवून आपल्याकडे स्थानकांचे नाव प्रस्तावित नाव मागवली त्याअर्थी एम.एम.आर.डी.ए. कडे हा मेट्रोचा प्रस्ताव आहे. डी.पी.आर तयार झाला नाही म्हणून त्यांनी यावेळेला आपल्या दहिसर चेकनाक्यापासून पुढे मिरा भाईंदरसाठी बजेटमध्ये प्रोव्हिजन केली नाही. परंतु एक फार हुशार पत्रकाराने तो शोध लावला आणि त्याने ती बातमी पसरवली. २०१९ पर्यंत दहिसर पर्यंतची मेट्रोल रेल पूर्ण करायची आणि आपला डी.पी.आर. तयार झाल्यानंतर कारण जोपर्यंत डी.पी.आर तयार होणार नाही. डी.पी.आर तयार करण्यासाठी तरतुद केली होती. आता डी.पी.आर तयार करण्याचे काम चालू आहे. त्याच्यानंतर याचे पुनच्छ बजेट पुढच्या याच्यात होईल. कॅन्सल झालेले नाही.

**अनिल सावंत :-**

आम्हाला २०१९ पर्यंत पाहिजे. सभापती महोदय आपल्या भाषणामध्ये बरेचसे उल्लेख केले. विकास कामांचे २०० एम.एल.डी. पाणी योजना सकवारचा घनकचरा प्रकल्प मिरा भाईंदर शहरातील उर्वरित भागाला एस.टी.पी. योजना कधी लागु करणार आणि आरक्षणे ताब्यात घेण्याचा विषय ह्या विषयाला टच सुध्दा केलेले नाही. महत्वाचे आणि ज्वलंत विषय आहेत. २०१८-१९ चा बजेट जेव्हा आयुक्तांनी स्टॅन्डींग मिटींगला सादर केला त्यावेळी आयुक्तांनी ४४३ करोडचे विकास कामांचा तपशिल दिला स्टॅन्डींग कमिटीला ज्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली आहे. काही कामे झालेली आहेत काही कामे पेडींग आहेत. ते ४४३ करोड रुपये २०१८-१९ मधून आपल्याला द्यायचे आहेत. बजेट कितीचा आहे. १२०० करोड ५० टक्के प्रशासकीय खर्च राहिले किती ६०० करोड. ६०० करोड मधून जर ४४३ करोड रुपये झालेल्या कामांचे जाणार असतील मग उरलेल्या पैशांमध्ये शहराची कामे कशी करणार? आपण काय प्रोव्हिजन केले आहे? २०१७-१८ चे आयुक्त साहेबांचे जे मुळ अंदाज आहेत. मागच्या आयुक्तांनी केलेले बजेट १४४२ करोड सुधारित बजेट दिलेले ८८९ करोड तफावत आहे. ५७३ करोड म्हणजे किती ३६ टक्के २०१७-१८ चे मुळ बजेट आयुक्तांचे स्टॅन्डिंग कमिटीचे आणखीन जास्त असेल. महासभेचे आणखीन जास्त असेल. ६७ टक्के फक्त आपण अचिव्ह करु शकलो आहोत. किती ६७ टक्के आयुक्तांचा अंदाज ६७ टक्के मग कोण कमी पडत आहे. प्रशासन कमी पडत आहे की आपले अंदाज चुकीचे आहेत. कारण आयुक्तांचा जजमेन्ट बजेट असतो. त्याच्यामध्येच आपण जवळ जवळ ६७ टक्के त्याच्यामध्ये आपण पोहचु शकलो. ६७ टक्के पर्यंत मग ह्या बजेटचे काय होणार आहे. राजकीय सुड बुध्दीने भाईंदर पूर्व आरक्षण १०९ तरण तलावासाठी आपण ह्या आर्थिक बजेटमध्ये तरतुद केलेली नाही. २६ तारखेच्या मिटींगमध्ये आमचे जेष्ठ नगरसेविका प्रभात ताई पाटील यांनी ज्यावेळी तरण तलावाचा विषय आला. लोढासाठी ठराव केला त्यावेळी सांगितले होते. पुढच्या मिटींगमध्ये आम्ही तो विषय घेऊन येऊ. परंतु पूर्ण वर्षामध्ये त्याची आर्थिक तरतुद नाही. करवाढीचे ३ प्रस्ताव पहिल्यांदाच स्टॅन्डिंग कमिटीने ठराव म्हणून घ्या. पुस्तकामध्ये त्यांनी दिलेले आहे. आणि स्थानिक आमदार त्यांचे अमुल्य अर्थपूर्ण मार्गदर्शन हे बजेट बनविण्यासाठी लागलं त्याचा उल्लेख ह्या बुकमध्ये आहे. सभापती महोदय आपले निवेदन राजकीय निवेदन करते वेळी आपण कोणाचेही नाव देऊ शकता. त्याला बंधन नाही. उद्या एखाद्या विद्यार्थ्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कारभारावर ज्यावेळी पी.एच.डी. करायची असेल त्यावेळी ही पुस्तक रेफर केली जाणार आहेत. जी ठेवलेली आहेत गेल्या इतक्या वर्षाचा इतिहास रेफर केला जाणार आहे आणि त्यामध्ये त्यांना फक्त मिळणार एकच नाव म्हणजे ह्या शहराला इतर लोकप्रतिनिधी नाहीत. करवाढीचे तीन प्रस्ताव आपण दिले. स्थानिक नेतृत्व ओपन मिटींगमध्ये सांगत आहेत की आम्ही कोणतीही कर वाढ केलेली नाही. तरी सुध्दा प्रस्ताव तुम्ही दिलेत. केंद्र व राज्य शासनाकडे अनुदान ऑगस्ट महिन्याच्या अगोदर त्यानंतर शहरभर जाहिरात त्याची झाली. एवढे करोड आणलेत एवढी कामे सॅक्शन केली. पण आपल्या बजेटमध्ये केंद्र राज्य शासनाकडील अनुदान शुन्य ३३ आणि ५३ नंबर पेज बघा. आगरी, कोळी, आदिवासी, वारकरी, भवन आमच्या सभागृह नेत्यांनी ठराव केला. आगरी, कोळी, आदिवासी, वारकरी भवनसाठी फक्त १० लाख सर्वांचे होईल. वेगवेगळ्या ठिकाणी दलित वस्ती अनुदान म्हणून एक फंड असतो. आपल्या जवळ रिझर्व्ह या शहरामध्ये त्या वस्त्या आहेत. ३०/११/२०१८ पर्यंत त्याच्यावर केलेला खर्च शुन्य आपण किती जागरुक आहोत. परिवहन सेवा २०१६-१७ मध्ये १२ करोड. २०१७-१८ मध्ये १२ करोड, २०१८-१९ मध्ये १३ करोड. कशाला चालवतोय आपण परिवहन सेवा. उपमहापौर साहेब तुम्ही उपमहापौर असते वेळी आपण एक रुपया कि.मी. रॉयल्टी घ्यायचो. ही परिवहन सेवा चालवण्यासाठी आणि आज १२ करोड, १२ करोड, १३ करोड आपण अनुदान देत आहोत. लोकांच्या टॅक्सच्या पैशातुन अनुदान देत आहोत आणि परिवहन सेवेची जरा हालत बघा ३७

बसेस ४८ बसेस सांगत आहेत. आम्ही चालवल्यात म्हणून गॅरेजमध्ये किती आहेत, ब्रिजखाली किती आहेत. मालमत्ता कराच्या बाबतीत मालमत्ता वाढीचा जो प्रस्ताव करवाढीचा प्रस्ताव दिलेला आहे. ठरावामध्ये तुम्ही सांगितलेल की ३१ मार्च २०१८ पर्यंत जे अर्ज प्राप्त होतील. कर आकारणीसाठी त्यांना जुन्या दराने कर आकारणी होईल. आपण दिलेल्या ठरावाचे वर्डिंग बघा. ३०/०३/२०१८ पर्यंत कर आकारणी केलेल्या मालमत्तांचे अर्ज महापालिकेस प्राप्त होतील. त्यांनाच जुन्या दराने कर आकारणी करावी. कर आकारणी केलेल्या मालमत्तांचे अर्ज म्हणजे काय? कर आकारणी केलेल्या मालमत्तांचे अर्ज की कर आकारणी करणेसाठी अर्ज सुधारुन घ्या नाहीतर तो मुद्दा पकडून उद्या जुन्या लोकांना नविन कर आकारणी केली जाईल. कर आकारणीसाठी आपण ठेकेदार नेमणार. मग डिपार्टमेन्ट काय करणार? ऑक्ट्रॉय ठेकेदार, एल.बी.टी. ठेकेदार त्या जळजळातुन कसे कसे आपण बाहेर आले आहोत. त्याच्यासाठी केवढी मोठी आंदोलने झाली कर आकारणी व्यवस्थित करायची असेल जे आपल्याला आयुक्त साहेब भेटले आहेत. सर्व डिपार्टमेन्टला काम करायला लावा. फिल्डमध्ये त्यांना काम करु देत. हे ठेकेदारी परत शहरामध्ये नका सुरु करु. बाजार फीमध्ये ३६ टक्के वाढ म्हणजे ह्या शहराला पूर्ण फेरीमय करुन टाकायचे आहे का आपल्याला. आज प्रत्येक नगरसेवक फेरिवाला हटवा फेरिवाला हटवा म्हणून त्या प्रभाग अधिका-यांच्या मागे लागत आहेत. अनधिकृत फेरिवाले हटवा आणि आपण प्रस्तावित किती केले ३६ टक्के वाढ फेरिवाल्यांच्या जवळून कलेक्शन ठेकेदार तुम्ही जर फेरिवाले वाढविले तर ते तुम्हाला जास्त पैसे देणारच आहेत. आपल्याला शहरामध्ये काय पाहिजे साहेब अशी हालत झालेली आहे. शहराची भाईंदर ईस्ट असू दे ते मिरारोड असु दे संध्याकाळच्या वेळेला फिरु शकत नाही. आमच्या शांतीनगरमध्ये फक्त फिरुन दाखवा. गाडी तर सोडून द्या. नवघर पट्टयामध्ये एवढे फेरिवाले वाढलेले आहेत. जांगीड, सिल्वर पार्क हे बघा किती फेरिवाले वाढलेले आहेत. हे फेरिवाले कमी करायचे ऐवजी आपण फेरिवाले ३६ टक्के कर वाढ आपण फेरिवाल्यांच्या आयुक्तांनी प्रस्तावित केल्या पेक्षा जास्त मालमत्ता कर मोकळ्या जागांवरील कर वसुल करणेसाठी आपल्याला पूर्ण अपयश आलेले आहे. मगाच मी जो ज चा प्रस्ताव घेतला होता कुंपण भिंत आणि माती भराव त्याच्यासाठी वैती साहेब ह्या वर्षामध्ये आपण शुन्य आपले कलेक्शन आहे. म्हणजे आरक्षण ताब्यात घेण्याचे आपण प्रयत्न केलेला नाही. एम.एम.आर.डी.ए. अनुदान शुन्य. एम.एम.आर.डी.ए. साठी हाऊसिंग स्किम ह्या शहरामध्ये सॅक्शन केल्या. त्याला ४ एफ.एस.आय. दिलेले आहेत. केवढा मोठा बोजा ह्या शहरावर आहे आणि त्यांच्या जवळून अनुदान शुन्य मागे मिलन म्हात्रे जेव्हा नगरसेवक होते २००७ मध्ये त्यावेळी त्यांनी कस सांगितल होत की ह्या शहरामध्ये इंडस्ट्रीज जे आहेत त्याच्या जवळून आपल्याला उत्पन्न जास्त आहे. टॅक्स वगैरे देणारे तेच लोक आहेत. आता एल.बी.टी. अनुदान असु दे, जी.एस.टी. अनुदान असु दे, ऑक्ट्रॉय त्यावेळी मेन होता. आज इंडस्ट्रीजची हालत बघा रस्त्यांची जाऊन दिवाबत्ती बघा, स्वच्छतागृह बघा. ३०/११/२०१८ पर्यंत आपण इंडस्ट्रीयल रस्त्यांवर खर्च किती केला शुन्य म्हणजे आपण किती जागरुक आहोत. शहरातला ज्वलंत प्रश्न त्याच्यासाठी रस्ता रोको साहेब ह्या शहरामध्ये दंगली घडल्या. ३ दिवस शहर बंद पडले. असा उत्तनचा घनकचरा प्रकल्प त्याच्यासाठी आयुक्तांनी १२ करोड रुपयांची तरतुद केली. भांडवली खर्च आरोग्य घनकचरा व्यवस्थापन आयुक्त साहेबांनी तो व्हिजीट केला असेल. प्रकल्प आणि त्याच्यामध्ये त्यातुन कशा चांगली निर्माण करावी. या दृष्टीकोनातून १२ करोड ठेवले असते. स्थायी समितीने तो कट करुन ८ करोड ठेवला. म्हणजे त्याच्यामध्ये कपात उत्तन वाल्यांना राहू द्या असचं सहन करु दे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मा. प्रमोद महाजन कला दालन आयुक्तांनी ३ करोडचे अंदाज केले. स्थायी समितीने काय केल १ करोड सभापती सांगतात की मी हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेंना मानणारा माणूस आहे. अनुदान कमी करुन टाकलं अशा प्रकारच हा अर्थपूर्ण बजेट आहे. माझी महापौर मॅडमना विनंती आहे की आयुक्तांनी जे अंदाज दिलेले आहेत तेच अंदाज धरुन हे बजेट इन्क्लुमेन्ट करा. शहराची घडी कुठेतरी सुरळीत राहील. ज्वलंत विषय आहेत. उत्तनचा घनकचरा प्रकल्प २०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना आगरी, कोळी, आदिवासी भवन मा. हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे कलादालन, नवघरचा तरण तलाव या गोष्टींना प्राधान्य द्या. ह्या विषयावर म्हणजे लोकांना जी तुम्ही प्रॉमीस केलेले आहेत आपण सर्वांनी लोकप्रतिनिधींनी प्रॉमीस केले आहेत. त्याची कुठेतरी पुर्तता होईल आणि करवाढ केली असेल तर ॲक्सेप्ट करा. आम्ही करवाढ केलेली आहे. त्यात काय चुकीच आहे. तर अशाप्रकारे हा अर्थसंकल्पावर मा. महापौर मॅडम आपण विचार करावा. त्यादृष्टीने त्यांनी निर्देश द्यावेत. तर तशाप्रकारे ते बजेट इम्प्लीमेंट करावे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम अपल्या परवानगीने बोलतो सन्मा. सभापती महोदय यांचे मनोगत ऐकल्यानंतर आजा माझे मित्र सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी ह्या वर्षाचा अर्थसंकल्पीय याच्यावर खुप चांगले भाषण केले. सुरुवातीला ते भाषण करत असताना त्यांना कळत नाही की सुधारीत किती सालचे आहे आणि मुळ

अंदाजपत्रक कुठल्या वर्षाचे आहे. हे त्यांना स्पष्टीकरण माहित नाही आणि त्यामध्ये त्यांनी पुढचे वाचन सुरु केले. मला हे कळत नाही त्यांच्या पार्टीचे गटनेते सन्मा. जुबेरजी इनामदार आमच्या सोबत तीन दिवस स्थायी समितीमध्ये चर्चा सत्रामध्ये त्यांनी सहभाग घेतला. एकही दिवस दांडी मारली नाही. एकही तास कुठे बाहेर गेले नाही. तिन्ही दिवस पूर्ण सर्व सदस्यांबरोबर चर्चा घडवून आणली. त्यांना जे पाहिजे होते ते त्यांनी घेतल त्यांना जे नको होते त्यांनी बाहेर काढलं. सभापतीने तशी परवानगी दिली होती म्हणजे अशी सगळी चर्चा सत्र घडवून आणल्यानंतर आज सावंत साहेब उठतात आणि असे सगळ बोलतात आणि एक मला कळत नाही. जोपर्यंत आमदारांचे नाव घेतले जात नाही ह्या शहरामध्ये तोपर्यंत शहराची वाढ होणार नाही हे त्यांना ही माहित आहे. शहरात कुठे सुधारणा होणार नाही हे त्यांना ही माहिती आहे. त्यातल्या त्यात असा विषय आहे ना की अडीज वर्षापूर्वीपासून त्यांनी तो काळ उपभोगला आहे म्हणजे ''सो चुहे खाके बिल्ली हज को चली'' असा तो विषय आहे.

**जुबेर इनामदार :-**

हा शब्द मागे घ्या.

**प्रशांत दळवी :-**

हे बघा मला अस वाटत आहे की मी काही कोणाला उद्देशुन बोललेलो नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही शब्द जो वापरला तो मागे घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मी कोणाला पर्सनल उद्देशुन बोललेलो नाही.

**जुबेर इनामदार :-**

कुठल्या समाजावर त्यांनी टिका केली आहे.

**प्रशांत दळवी :-**

अर्थसंकल्पावरती चर्चा करताना आपणच प्रश्न उपलब्ध उपस्थित करावे आणि आपण उत्तर देत बसायचे आणि नंतर महापौरांना सांगतात की महापौर मॅडम ह्या अर्थसंकल्पामध्ये आम्ही जे सुचवल त्यात तरतुद करा.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही प्रत्येक धर्माचा सन्मान करतो.

**प्रशांत दळवी :-**

आम्ही पण सन्मानच करतो. कोणत्या धर्माची भावना दुखावली जाणार नाही अशा प्रकारचे वक्तव्य नाही आहे मी आताही सांगतो. ह्यामुळे अर्थसंकल्पावरती चर्चा करत असताना सावंत साहेब जे म्हणाले मग तो पाण्याचा विषय असेल किंवा जे जे काही विषय घेतले फेरिवाला धोरण द्या. आम्ही ठरवतो त्याप्रमाणे आम्ही जी वाढ केलेली आहे तर महापौर मॅडम आम्ही मार्केट रुपांतर करणार आहोत ना. मार्केटमध्ये आम्ही त्यांना बसायला जागा देणार. नाहीतरी ते फेरिवाले नेहमी बसतात २५ वर्ष त्यावेळेला महापौर मॅडम इकडे कोणी आले नाही आणि त्यामुळे.

**अनिल सावंत :-**

एवढे नव्हते.

**प्रशांत दळवी :-**

किती होते काय होते सावंत साहेब तुम्ही बोलत असताना मी बोलत नव्हतो.

**अनिल सावंत :-**

तुम्ही माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी बोलतो. मी तुमच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. सुधारित बजेट बद्दल तुम्ही काय बोललात माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मी महापौर मॅडमला बोललो.

**प्रशांत दळवी :-**

हे बघा या शहराच्या अर्थसंकल्पामध्ये वाढ करणे किंवा त्याला कमी करणे किंवा वाढवणे हा आमचा अधिकार आहे. त्यामुळे तुम्ही आम्हाला त्या अधिकाराबाबत शिकवायचे नाही. ह्या ठिकाणी महापौर मॅडम आपण जे नियोजन केलेले आहे आपण जो अर्थसंकल्प केलेला आहे सन्मा. आमचे सभापती महोदय धृवकिशोर पाटील साहेबांनी जो अर्थसंकल्प स्थायी समितीमध्ये मंजूर केलेला आहे. हे बघा विरोधक हे विरोधाला विरोध करणार आहेत हे मला नक्की माहित आहे. प्रत्येक गोष्टीला त्यावेळेलाही अर्थसंकल्पामध्ये ३ दिवस चर्चा केली हे म्हणात ऑन रेकॉर्ड अरे आणा ना तुम्ही ऑन द रेकॉर्ड. आपण करायला तयार आहोत. असे काही नाही आणि तुम्ही पण ऑन द रेकॉर्ड बोलत आहेत. त्याही वेळेला चर्चा केल्यानंतर

महापौर मॅडम यांनी विरोधामध्ये ठराव केले ते ही आपण ठिक आहे. परंतु ह्या वेळेला हा विषय महासभेत आल्यानंतर अशाप्रकारे आणि अर्थनिहाय कुठला अर्थ काढतात. तुम्ही त्यामुळे महापौर मॅडम माझी विनंती राहील की सर्व सदस्यांना जो अर्थसंकल्प आज येथे सभापती महोदय यांनी मांडला आहे. तो महापौर मॅडम आपण सर्वांनी एकमताने पास करुया. धन्यवाद.

**गिता जैन :-**

आयुक्त महोदय माझा प्रश्न प्रशासनावर आहे. मी २०१२ पासून जो रेकॉर्ड मागवलेला आहे. आयुक्त महोदय मला कुठेच आपल जे वर्षाअखेर प्रत्यक्ष झालेल्या रक्कमेमध्ये आपण कुठेही ६० टक्केच्या वरती गेलेलो नाही. आणि दरवेळीचा अर्थसंकल्प साहेब मी आपल्याला एक कॉपी देते आणि आताच मी माहिती काढली. अजुनही आपण ६० टक्के वरच पोहोचलेलो आहोत. आणि मला वाटत नाही की दोन दिवसात आपण काही खूप मोठा चमत्कार करु. मग आपण जेव्हा जे बजेट प्लॅनिंग करतो तेव्हा ६० टक्के तुमचे कलेक्शन आहे. ४० टक्केची तुट पहिलेच आहे आणि त्यानंतर साहेब मी दुसरी माहिती मागवली सावंत साहेबांनी त्याचा उल्लेखही केला. आपले साहेब काम पूर्ण देयक बाकी म्हणजे अजूनही आमच्याकडे रोज कोण कोण येतो आमचे बील झालेले नाही तशी ६१ कोटी बरोबर आहे आणि कार्यादेश देऊन झाली. तशी ५३ कोटी तेही बरोबर आहे. हे दोन तर कम्पशन्स झाली. तुम्हाला बाकीचे पण आहे. जे ४३ पर्यंत पोहचते हे तर दोन कम्पशन्स आहे असे मला वाटते मग याचे तुम्ही करणार काय ते कॅन्सल करणार आणि नविन कामे घेणार मला वाटते प्रशासनाने म्हणजे तुम्हाला जेव्हा तुम्ही आताच आहे पण तुम्हाला जेव्हा इकडे दिले तेव्हा काही प्रशासनाने हे ५ वर्षाचा रेकॉर्ड दिला नाही का ६० टक्के कलेक्शनचा? मग आपण १०० टक्के गृहित धरुन आपण पहिला ते बजेट करतो. आणि मग आपण सांगतो आमचे कलेक्शन एवढच आहे. वर्षाअखेरीज स्पील ओव्हर मग आता स्पिल ओव्हरसाठी आपण काही ठेवलेले आहे का? का कॅन्सल करायचे आहे? काय करायचे आहे?

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम मेरा विषय ऐसा है हमारी सन्मा. महापौर मॅडमने जो कहाँ बिलकुल सही है।

**गिता जैन :-**

महापौर मॅडम पहिला मला एक सांगा तुम्ही तशी परवानगी देतात का? आताच तुम्ही सांगितलं सभेच्या सुरुवाती आधी की हात वर करायचे आणि बोलायचे मी बोलत असताना तुम्ही त्यांना परवानगी दिली आहे का?

**सुरेश खंडेलवाल :-**

मी हात वर करुन घेतली मॅडम तुमचे झाले कम्पलीट म्हणून मी हात वर करुन विचारलं.

**गिता जैन :-**

मैं आयुक्त से जवाब मांग रही हूँ।

**मा. महापौर :-**

खंडेलवालजी आप बैठ जाईए।

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब बेलवटे साहेब मला फक्त तेवढा जवाब द्या. तुम्ही स्पील ओव्हरसाठी काही ठेवलेले आहे का आपण हे सगळे काम कॅन्सल करायचे आणि झालेली कामाला बिल द्यायचे का? साहेब दुसर आपली उत्पन्न वाढणार असे आपल्याला वाटते. खुप छान मी अशी आशा ठेवते की आपले उत्पन्न वाढायचं आपण ह्या वर्षापासून शास्तीचे दर हाफ झालेले आहेत साहेब. शास्तीचा दर शास्ती माफ झालेली आहे. आणि बाकीचे दर माफ झाले आहेत. दुसर गेल्यावर्षी जे काही आपले टाऊन प्लॅनिंगला प्रॉब्लेम असेल आपण जास्त काही प्लान पास केले नाही म्हणजे ओ.एल.टी. पण आपल्याला काही जास्त अशी आशा नाही. ओ.सी. खूप झालेली नाही आहे म्हणजे टॅक्समध्ये वाढीव टॅक्सची पण एवढी आशा नाही. मग तुम्ही उत्पन्न वाढवा थोडेसे उपाय आहेत. मी तर सांगते सगळे तुमचे बरोबर आहे. उत्पन्न वाढवायला पण प्रशासनाने ही चुकीचे आकडे द्यायचे कशाला. तुम्ही सादर करताना १२०० कोटीचे तुम्ही सादर केले आहे आणि ९०० च्या वर आपण जात नाही. तुम्ही १२०० कोटीचे सादर कसे केलेले आहे. आणि स्पील ओव्हरसाठी तुम्ही ठेवलय काय? मग हे झालेल्या कामाला आपण द्यायचे नाही ते कार्यादेश झालेले रद्द करायचे ते तरी सांगा. हे उत्तर मी प्रशासनाकडून मागते. दुसरे कोणी मध्ये बोलून काही सांगायचे नाही. मला प्रशासनाने उत्तर द्यायचे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम सभागृहात बजेट मांडलेला आहे. बजेटवर आयुक्तांनी मत मांडणे किंवा त्याच्यात सहभाग घेणे हे अपेक्षित नाही. आपल्या प्रश्नांची उत्तर माझ्या कार्यालयात या, मला जेवढ वकुब आहे त्याप्रमाणे

आपल्याला उत्तर दिली जातील. जो बजेट मी सादर केला त्याची कारण मी आपल्याला देऊ शकेल. यू कम ऑन एनी टाईम ॲट युअर टाईम. पण आज मी इथे खुलासा करणे न्यायउचित नाही.

**गिता जैन :-**

ठिक आहे साहेब मी तुमच्याकडून खुलासा मागत नाही. पण आमची सुचना घ्या कारण तुम्ही जे १२०० कोटीचे मांडलेले आहे आणि आताच मी जस्ट दोन मिनिटा आधी विचारले तेव्हा आपले कलेक्शन ९०० च्या वर गेलेले नाही. उत्पन्न वाढेल मी तुमच्या बरोबर आहे. आम्ही सगळेच तुमच्या बरोबर असु. उत्पन्न वाढवायला तीन दिवसा आधी जैसवाल साहेबांचा तिथे सन्मान झाला. त्यांनी उत्पन्न दुप्पट केल म्हणून तर आम्हीही तुमचा सन्मान करु. पण आता जे मांडलेले आहे साहेब फक्त माझी एक चिंता आहे की आपण जे कार्यादेश दिलेले आहेत ते जर आपण कामे घेतली तर नविन कामे करु शकणार नाही. मग ते कुठे जाणार किंवा ही काम कॅन्सल करायचे का तेवढ तुम्ही फक्त भले मी तुम्हाला नंतर येऊन भेटणार तुम्ही तिथे सांगा. पण तुम्ही जेव्हा सादर करतात. तेव्हा १२०० कोटीचे का केले ते एक्सप्लेनेशन मला नक्कीच हवे आहे. साहेब आपले १८४ कोटीचे जे कर्ज आहे काँक्रीट रस्त्यासाठी ते झालेले नाही. तरी आपण काँक्रीट रस्त्याचे कार्यादेशही दिला आणि काम होऊन सुध्दा झालं मग ते कस झाले. आपण कार्यादेश कसे दिले?

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम विषय ऐसा है की हमारे मित्र सभापती महोदय ने पुरा अपना निवेदन सभी लोगो ने अच्छी तरह से सुना। उसके बाद में हमारे मित्र आदरणीय अनिलजी ने भी अपना निवेदन रखा। अब निवेदन सभी ने सुनने के बाद में यदी उसकी डिटेलवार तो हमारे सभापती महोदय अभी उसका रिप्लाय देंगे ही जो-जो विषय उन्होंने रखे है की तरण तलाव का विषय था। चाहे उत्तन का था जिस तरह से पुरा बजेट के अंदर चिजो का ध्यान रखा है। लेकिन मेरा एक सवाल यहाँ पर यह है की अभी मैंने ऐसा में भी रोज जा रहा हूँ। मुझे पता चल रहा है की स्पील ओव्हर का जो विषय है मेरा यह मानना है की अभी जो आऊटस्टॅन्डिंग अपनी है कमिनशर साहब वैसे तो में सारी स्टडी मेंने भी की बजेट के उपर और पिछली बार का जो इन्कम का जो रिझन था वह भी समज में सभी सदस्यों को आता है की हमने बजेट के अंदर कुछ पेमेन्ट ऐसे है की जो बरसो से आऊटस्टॅन्डिंग चल आ रहे है। जिनको हम लोग कभी उसको निग्लेट नही करते। हमने ऐसा प्रस्ताव कमिटी के अंदर हमने मंगाया है की जो पेमेन्ट बरसो से आऊटस्टॅन्डिंग चले आ रहे है। जिनको हम बजेट में करते है उसके लिए भी हमने प्रस्ताव रखा और हमारे आमदार साहबने जो पता लगाया है की हमारा स्टॅम्प ड्युटी का १ टक्का जो रेव्हेन्यु आता है वह ७० करोड रुपये हमारा वहाँ से आना बाकी है। पिछली बार का जी.एस.टी का हमारा १९ करोड रुपये और इस साल का ५ तारीख को ३८ करोड रुपये हमारा जी.एस.टी. का पेमेन्ट बाकी है। यदी यह १०-१५ करोड रुपये हमारा यदी आता है तो ६१ करोड और यह ५५ करोड की जो व्याख्या मैंने सुनी है यह दोनो उसमें पुरा हो जाता है। स्पील ओव्हर पुरा हो जाएगा हम यह सोचते है की हमको पैसा देना है लेकिन जो पैसा आनेवाली जो बाते है उसका भी जानकारी हम डिपार्टमेंट से लेंगे। तब हमको समज में आ जाएगा की पैसा लाना है तो पैसा आएगा तो चुकाया जाएगा। तो मेरा यह कहना है की जो भी उसका आऊटस्टॅन्डिंग अमाऊंट है उन सब को भी जल्दी से जल्दी यदी आएगा तो सारे स्पील ओव्हर खत्म हो के हम पुरा १०० टक्का हम भी यह चाहते है की बजेट के अंदर जो काम प्रस्तावित है वही काम होने चाहिए और उसीके लिए हम पुरी तरह से कोशीश करेंगे और में खुशी की बात बताता हूँ की पिछली बार जो टाऊन प्लानिंग के अंदर हमारा जो डेफिशीएट था वह स्टेट इन्वेस्टमेंट का हाय कोर्ट ऑर्डर की वजह से डेफिशीएट हुआ था। हाय कोर्ट का ऑर्डर था इसिलिए प्लान पास नही हो रहे थे। इसिलिए नई बिल्डींगो को टॅक्स नही लग रहा था। लेकिन आपको शायद मालुम होगा की स्टेट इन्वेस्टमेंट का हाय कोर्ट का ऑर्डर आ चुका है सारी परमिशन अभी शुरु हो चुकी है और यह खुशी की बात है की, इसबार हमारा टाऊन प्लानिंग का जो डेफिशिएट है वह कम नही होगा। इसके लिए उसका अंदाज उसी तरह से लिया है। यह सारी हमने स्टॅन्डिंग कमिटी में चर्चा करने के बाद सब चीजो को अच्छी तरह से सोच समज के लिया है और यह जानकारी सभी सदस्य अच्छी तरह से ले। ऐसा मेरा मानना है धन्यवाद।

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आकडेवारीवर खरी परिस्थिती आहे. तुम्ही काही बोलू शकत नाही. तुम्ही आमच्या हातामध्ये सोपवून दिले. मी माझा अर्थसंकल्प तुम्हाला दिला. तुम्हाला त्याच्यामध्ये काय योग्य बदल करायचा तो तुम्ही करत रहा. मात्र मला जे योग्य वाटेल तेच मी करेन आणि आयुक्त तेच करतात. कितीही वाढ आम्ही इथे फुगवली मालमत्ता सर्वसाधारण कर तो सुधारीतमध्ये आयुक्तांनी परत होते. त्याच जागेवरती २०१६-१७ ला आणुन उभे केलेले आहे. ७५ कोटीवर ७६ कोटी आधी दिले होते. सुधारीत आम्ही

जेव्हा मान्यता देतो सभागृहात अंदाजपत्रकावर तेव्हा सुधारीतला ही देतो आणि पुढचा अंदाज सुधारीत अंदाज का कारण की अजुन आपला मार्च उलटलेला नाही. नाही तर तो अंदाजपत्रक ठाम झाला असता. गेल्या वर्षी २०१७-१८ मध्ये स्थायी समितीने १०० कोटी रुपये सर्वसाधारण मालमत्ता कर ही तरतुद ठेवली. आयुक्तांनी सुधारीतमध्ये त्याला परत ७५ वर आणली आहे. ठेवली होती ७६ आधी सुधारीत करताना अजून कमी केली कारण त्यांना ही माहिती आहे. एवढे पैसे येणार नाही म्हणजे २५ कोटी रुपये तिथे तुमचे कमी झाले आणि दरवर्षी महापौर मॅडम अडचणीचा विषय असा असतो की हे स्पील ओव्हर का निर्माण होत असतात आयुक्त महोदय स्पष्ट आहे जमेची बाजू तुम्ही सुधारीत तरतुद करताना तुमच्या समोर स्पष्ट ठेवता खर्चाची बाजु बाकीचे जे भाग आहेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सार्वजनिक बांधकाम असु दे, आरोग्य असु दे, बाकीचे महत्वाचे जे काही विभाग आहेत ज्या स्थायी समितीने जी तरतुद करुन दिली त्या अनुषंगाने आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतात. निविदा प्रक्रिया करतात. कारण त्याच्यामध्ये तरतुद आहे. असे स्पष्ट त्यांचे मत होऊन जाते. कागदावर असलेले घोडे हे मैदानावर धावत नाही खरी परिस्थिती आहे. समोर आपल्याकडे पैसा हातामध्ये काहीच नसताना अशाप्रकारे नको तो अर्थसंकल्प फुगवायचा हे ह्या शहराच्या हितामध्ये योग्य नाही आणि त्या कारणामुळे तत्कालीन गिते साहेबांनी अशाप्रकारे एक ग्रंथ तयार करुन सार्वजनिक बांधकाम विभागाचा आमच्याकडे दिलेला आहे. सखोल आहे ४४३ कोटी रुपये कामे ह्या वर्षामध्ये पडणारी ११६ कोटी रुपये कामे निविदा प्रक्रियामध्ये असलेली दुसरी कामे आर्थिक प्रशासकीय मंजुरी देऊन ठेवलेली दुसरी काम अशाप्रकारे ४४३ कोटी रुपयाची कामे ही तुम्हाला आम्हाला आधी पूर्ण करावी लागणार. याला मार्गस्थ करावे लागेल. त्याचे कारण असे आहे तुम्ही सत्ताधाऱ्यांनी हा विषय मांडला असेल आणला असेल. उपाययोजना केली असेल. कुठेतरी याचा प्रभाव आम्हाला ही त्याचा पडतो आम्ही आमच्या लोकांना सांगितलेले आहे तुम्हाला अशाप्रकारे सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत. शहरामध्ये कॉंक्रीटचे रस्ते होतील, शहरामध्ये उड्डाणपुल असणार. सगळ अशाप्रकारे याला स्वप्न दाखवायचे नंतर हातामध्ये आपल्याकडे काही शिल्लक असत नाही हा विषय योग्य आहे. आयुक्त महोदय वर्षानुवर्ष तुम्ही तक्ता काढत आलेले आहेत. स्टॅटिस्टीक रिपोर्ट सर्वसाधारण मालमत्ता कराची परिस्थिती अशी आहे. साहेब डिसेंबर महिन्यामध्ये ४० कोटी रुपये जमले होते आणि आज..........

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब परत परत मालमत्ता कराची जी आपण गोष्ट करत आहात आज आपण १०० करोडच्या वरती आहोत. याची माहिती घ्या ४० आणि ७५ करता खुप चिंता करु नका. आतापर्यंत १५ बजेट ह्या महापालिकेचे झाले आहेत. हा १६ वा बजेट आहे. आणि ज्या प्रचलीत चुका आहेत त्या नक्कीच सुधारणार आहोत. सुधारणा होणार आहे आणि खुप काही नाविन्यपूर्ण अमुलाग्र ह्या शहरामध्ये बघायला मिळणार आहे. त्याच्यामुळे खुप चिंता करु नका. आपण खुप काही चांगल ह्या शहराला देणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

चांगल आहे साहेब तुम्ही दिलत तर अतिउत्तम लोक तुम्हाला आठवण ठेवतील. पण आमची भुमिका आम्ही इथे मांडणार. सर्वसाधारण मालमत्ता ५७ कोटी रुपये जमलेले आहेत. तरतुद १०० कोटीची म्हणजे ४३ टक्के आम्ही अजून कमी आहोत. तफावत आहे. आणि येणाऱ्या एक दोन दिवसांमध्ये मोठा पराक्रम आम्ही काही करणार नाही. म्हणजे साहेब कुठेतरी हा जो स्पील ओव्हरचा विषय आहे. त्याला निकाली लावणे गरजेचे आहे. साहेब मुलभूत सुविधा याच्यासाठी शासनाकडून अनुदानाचा विषय साहेब अनुदानात कॉंक्रीटचे रस्ते आपण करणार आहोत. आमच्याकडचा रस्ता एक प्रलंबित आहे. चांगली गोष्ट आहे व्हायला पाहिजे. शहर वेगाने वाढत चालले आहे. दरवर्षी आपण कोट्यवधी रुपये खर्च करतो. डांबरीकरणासाठी पुर्नपृष्ठीकरण करण्यासाठी, दुरुस्त्यांसाठी त्याच्यावरती कॉंक्रीटचे रस्ते झाले तर कुठेतरी ते सोयीस्कर होऊन जाईल. आर्थिक बाबींसाठी चांगले आहे. मात्र साहेब हे १५ तारखेचे पत्र आहे मिरा भाईंदर महानगरपालिकेने १५.०३.२०१८ आताचे पत्र आहे. तुम्ही पैसे नाही पाठविले ३४ कोटी रुपये ही जी काम झालेली आहेत साहेब अनुदानातून ३० टक्के अनुदान, ३० टक्के खर्च ३३ टक्के महापालिकेला जातो. कोस्टक लावला होता त्याप्रमाणे आपले ३३ टक्के आपण खर्च करुन झाला साहेब अनुदान आलेले नाही. अनुदान आले नाही. म्हणून कर्ज नाही कर्जाचे साहेब दरवर्षी ३८ कोटी रुपये हा आम्हाला इनस्टॉलमेन्ट आहे. ते आपल्याला दरवर्षी भरायचे आहेत. बाकी परत कामासाठी आपण कर्ज घेतलेले आहेत. विकास कामांसाठी घेतलेले कर्ज पर्जन्य जलवाहिनी, विकास आराखड्यातील रस्ते बाकी ३८ कोटी डोक्यावर आता अजून आहेत. आपली आर्थिक परिस्थिती किती कमकुवत असताना अशाप्रकारे साहेब चुकीच्या पध्दतीने टेंडर प्रक्रिया करणे कार्यादेश देणे, काम सुरु करणे हे कितपत योग्य आहे. साहेब खरी परिस्थिती अशी आहे आम्हाला आजच्या तारखेत ती आमच्याकडे कामे सुरु आहेत साहेब त्यांना आम्हाला त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. ती काम कम्पलीट करुन घेतली पाहिजेत. साहेब आज पूर्ण बजेट हा एक साधारणतः

अंदाज काढला कारण सर्वात जास्त आपला खर्च सार्वजनिक बांधकामावरच होणार. १४० कोटी रुपयेची काम साहेब पी.डब्ल्यू.डी. च्या वेगवेगळे जे लेखाशिर्ष आहेत त्यातुन साहेब एकत्र केले तर १४० कोटी रुपये आपल्याकडे पी.डब्ल्यू.डी. मध्ये येतात. कितीही आम्ही वर्षाच्या अखेरपर्यंत कितीही पुर्नविनियोजन केल तरीही आपण तुट भरुन काढू शकत नाही. उत्पन्न नसताना गेल्यावर्षी खर्चाची बाजू २०१७-१८ मध्ये एकूण महसूली सहवितरण खर्च अ,ब,क,ड,ई विद्युत साहेब २९६ कोटी रुपयेचा होता. खर्च केला ३४३ कोटी म्हणजे ७५ कोटी रुपये जास्त खर्च केले आता ७५ कोटी रुपयाचे काय पुर्नविनियोजन झालेले नाही. मग खर्च झाले कसे? तरतुदीच्या बाहेर खर्च करायचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? याला कुठेतरी साहेब तुम्हाला अंकुश लावावा लागेल याला थांबावावे लागेल साहेब नाहीतर हा महापालिकेचा दिवाळीखोरीवर गेलेला विषय कधी संपणार नाही. परिस्थिती अतिशय बिकट आहे. साहेब जमेच्या बाजूमध्ये ह्या वर्षामध्ये ३८ टक्केचा फरक आहे. साहेब ३८ टक्के म्हणजे हा काही कमी नाही झाला. जमेच्या बाजूमध्ये तुमच्या उत्पन्नामधून साहेब १०० रुपये मधून फक्त ६० रुपये तुमच्याकडे आले. ६२ रुपये ३८ रुपये तुमच्याकडे अजून येणे बाकी आहे. अशा परिस्थितीत साहेब नविन कुठलीही काम प्रस्तावित करणे पुढच्या वर्षामध्ये हा शहराच्या भविष्यासाठी हानिकारक असणार आहे. या विषयावर आमची केलेली सुचना यावर बारकाईने लक्ष द्या. व्यवस्थित साहेब आपण त्याची अंमलबजावणी करा.

**निलम ढवण :-**

सन्मा. महापौर मॅडम सभापती साहेब आता पर्यंत बरीच या विषयावर चर्चा झालेली आहे. परंतु मी २-३ गोष्टींवर बोलु इच्छिते. प्रथमतः मगाशी जे आपण सांगितल आपका शहर आपका सुझाव हे इलेक्शनच्या वेळी पण झालेले होते त्यानंतर आता झाले मला वाटतं प्रत्येक नगरसेवकांना आपआपल्या वॉर्डामध्ये लोकांसाठी काय पाहिजे हे नविन सांगायची गरज नसेल तरच तो नगरसेवक म्हणून सक्षम असेल. आणि नगरसेवकांना जर तेवढा अभ्यास नसेल तर मग हे आपका शहर आपका सुझाव सबका विकास सबका साथ पुढच मी बोलत नाही. आपला विषय आपल्या बजेटमध्ये इतरांनी देखील ती चर्चा केली बजेट फुगीर जो होता आणि त्यानंतर जे नगरसेवकांना भोगावे लागते त्याचे एक उदाहरण देऊ इच्छिते हे बजेट फुगीर केल्यामुळे मागचे २०१५-१६ पासून २०१६-१७ आणि आता २०१७-१८ काही लोकांचे नगरसेवक निधी प्रभाग निधी साठी देखील गेल्या ६-७ महिन्यांपासून त्यांना निधि हक्काचा असतो. कारण जनरलमध्ये निधी संपला म्हणून काही सांगु शकतात आणि तो निधी देखील आज इतके वर्ष १५ आणि १० होता खरतर ह्यावेळी वाढला पाहिजे होता. कारण सगळीकडे महागाई वाढली बाकीचे विषय वाढतात. त्यानुसार नगरसेवकांना तो एक मानाचा निधी मिळतो त्यांची हक्काची काम वॉर्डातली करण्यासाठी निधी असतो तो निधी यावेळी तरी वाढला पाहिजे होता तो न वाढवता कमी करण्यांत आलेला आहे. सभापती महोदय याचा गांर्भियाने पुन्हा विचार करा आणि निधी देखील कमी आहे आणि उद्या जर या नगरसेवकांनी सांगितल मागची बील पेंडींग आहेत त्यानुसार अमाऊंट जर कमी होत गेली तर नगरसेवकांनी कामे कशी करायची मला माहिती आहे याच्यातही राजकीय डाव असतीलच तुमच्या सत्ताधाऱ्याचे कामे फटाफट केली जातील. विरोधकांनी काय करायचं तर याचा गांर्भियपूर्वक विचार आपण करावा. सभापती महोदय जो नगरसेवकांचा निधी आहे तो १५ आणि १० जो ज्या पध्दतीने दिला जातो तो तरी पूर्णतः देण्यात यावा. त्यानंतर फेरिवाल्यांचा जो विषय आहे फेरिवाल्यांचा विषयामध्ये हे जे ३७, ३८ जे ३६ टक्के काही वाढविले तर त्यामुळे इनडायरेक्शन तुम्ही चालना देत आहात का फेरिवाले बसण्यासाठी एकतर त्यावेळी मगाशी जी चर्चा झाली त्यामध्ये काही सत्पूर्वीचे सत्ता बदलत असते जेव्हा ते होते त्यांना सांगितल गेल की तुम्ही सत्तेत होते. तेव्हा हे केलं ते सत्तेत होते म्हणून त्यांनी केल म्हणून ते आपण परत तेच करायचे का? परिवर्तनाची भाषा मग हे परिवर्तन आपल्याकडून का घडवू नये. मग त्यामध्ये तुम्ही आज पूर्वी ४-१० फेरिवाले बसायचे पूर्ण नवघर पट्टा, स्टेशन पर्यंत भरला गेला आहे त्यांच्यावर कधी कारवाई होत नाही यांची वसुली होत जाते. ही जी तुम्ही वसुलीसाठी फेरिवाल्यांना बसवत आहेत का? हे सर्व गांर्भियपूर्वक जो शहराचा विकास करायचा आहे तो भकास होत चाललेले आहे. त्या भकासगिरीकडे आपण लक्ष द्यावे त्याचप्रमाणे राजकीय हेतु न ठेवता आरक्षण क्र. १०९ भाईंदर पूर्वेला एकही जवळपास नवघर बी.पी. रोडच्या दरम्यान तरणतलाव नसल्यामुळे आपण त्याच्यावर मेन्शन केले आहे की लोढा संकुलातील ॲमीनिटी स्पेसच्या इथे तरण तलावासाठी तरतुद केली आहे. परंतु ते तरणतलाव विकासकाने बांधावे ही अटिशर्ती त्यांना लागु होत असल्या कारणाने तिथे आपल्या तरतुदीची गरज नाही. ती तरतुद आपण नवघर पट्टयामध्ये आरक्षण क्र. १०९ मध्ये वापरुन तरण तलाव आपण बांधण्यात यावे. त्याचप्रमाणे वृक्षप्राधिकरण आणि आरोग्य संदर्भात ज्या गाड्या लागतात त्या गाड्या एवढ्या मोठ्या १५ लाख लोकवस्ती असलेले मिरा भाईंदर शहरासाठी कमी पडतात. तर त्या गाड्यांमध्ये देखील आपण नविन गाड्या समाविष्ठ करुन घ्याव्या. कारण आरोग्याच्या वेळी औषध फवारणीसाठी देखील गाड्या कमी पडतात. वृक्षप्राधिकरणासाठी

मोठ्या उंचीच्या हाईटच्या गाड्या नसल्यामुळे त्याही गाड्या आपल्या याच्यामध्ये कमी आहेत. त्याचाही गांर्भियपूर्वक विचार आपण सर्वांनी केला पाहिजे होता. त्यासंदर्भात देखील आपण विचार करावा आणि सर्वांना समान न्याय देऊन आपण सर्व नगरसेवकांना योग्य पध्दतीने काम करण्यासाठी प्रेरणा द्यावी अशी विनंती करते.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये एकच मुद्दा सांगतो मी वैती साहेब १६ वे वर्ष आपण हे बजेट बनवल पण हे एकमेव बजेट अस आहे या बजेटमध्ये पुर्नविनियोजनाची तरतुद बजेटमध्येच केलेली आहे. ते चेंज करा. आणि मगाशी ४ नंबर पेजवर मी जे सांगितल होत तिथे चुकीने आयुक्त साहेबांचे निवेदन आहे. २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक तिथे २०१८-१९ चे पाहिजे ते चेंजेस करुन घ्या.

**गिता जैन :-**

मला एक विचारायचे होते आपण फवारणी करिता जे १०१ कामगारांना कमी करायचे असा आदेश आहे. मग आपण फवारणी दुस-यांना दिली आहे का? मग त्या फवारणीसाठी आपण काय करणार आहोत?

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम सर्व सदस्य जुबेरजी "उम्र जहॉ कर दी लोगो ने ओरो के वजुद में नुक्स निकालते निकालते, उम्र जहॉ कर दी लोगो ने ओरो के वजुद में नुक्स निकालते निकालते, इतनाही खुद को तराशा होता तो फरिश्ता बन जाते" मा. महापौर मॅडम स्थायी समितीमध्ये १६ सदस्यांनी सर्वपक्ष सदस्य होते मस्त व्यवस्थित चर्चा केली. आमचे मित्र जुबेरजी इनामदार हे सुध्दा होते त्यांनी ज्या सुचना सांगितल्या त्याच्यातल्या ८० ते ९० टक्के सुचना आम्ही अंमलात आणल्या आणि त्यांनी पण सांगितल त्यांना पण काही पक्षाच्या मर्यादा असतात त्याप्रमाणे काही सुचना त्यांच्या आम्ही घेतल्या नाही आणि जस तुम्ही सांगितल की अर्थसंकल्प फुगवलेला आहे. तर हा अर्थसंकल्प अजिबात फुगवलेला नाही कारण की सन २०१५-१६ ला १३८४ करोडचे आयुक्तांनी अंदाजपत्रक दिलेले होते महासभेने १५५१ केले. सन २०१६-१७ चे १५३८ करोडचे होते. सन २०१७-१८ चे १५६२ करोडचे होते आणि ह्यावेळी आपण फक्त १३६९ कोटीचे केलेले आहे. म्हणजे अर्थसंकल्प आपण फुगवलेला नाही. दुसरी गोष्ट की मालमत्ता कर १०० करोडचे आयुक्तांचा अंदाज होता आपण त्याच्यावरती १.२५ कोटी केलेला आहे. त्याच्या मागचे कारण जस्टीफिकेशन पण त्यावेळी स्थायी समितीमध्ये मी दिलं होत की ह्यावेळी ज्या मालमत्तांना कर लागलेला नाही. काही मालमत्तांमध्ये वाढ झालेली आहे. काही मालमत्तांच्या वापरामध्ये बदल झालेला आहे. झोपडपट्टी सर्वेक्षणाअंतर्गत २० हजार झोपडपट्टयांना अजुन टॅक्स लागलेला नाही. आणि अशा अनेक झोपडपट्टया आहेत ज्यांना अजिबात टॅक्स लागलेला नाही आणि त्यामुळे महापालिकेतर्फे त्या लोकांवरती टॅक्स लावून त्यांना कर आकारणी करणार आहे. त्याच्यामुळे जी वाढ होईल आणि त्यावेळी जुबेरजींशी आम्ही आमची चर्चा पण झाली. त्याच्यामध्ये चर्चेअंती निष्पन्न झाले की जवळजवळ २५ ते ५० करोड रुपये वाढू शकतात परंतु याच्यामध्ये व्हील पावर जी पाहिजे ती प्रशासनाची पाहिजे आणि प्रशासनाकडे मॅन पावर कमी असल्यामुळे अभिकर्ता नेमून ते करण्याचा विचार आहे. त्याच्यामुळे सुध्दा जस पासपोर्ट आहे तो पासपोर्ट टाटा कन्सल्टन्ट मार्फत इश्यु केला जातो. सगळी यंत्रणा टाटा कन्सल्टन्सीची असते. पण जो मेन ऑफिसर असतो तो गर्व्हमेन्टचा असतो. त्याचप्रमाणे आयुक्तांना एक संकल्पना सांगितलेली आहे की अशाप्रमाणे टॅक्स वसुली जर केली किंवा आपण कर आकारणी बद्दल असे प्रयोजन केले किंवा मालमत्ता कर अशाप्रकारे वसुल केला किंवा आपण आऊटसोर्सिंग केल तर १०० टक्के ही मालमत्ता करामध्ये वाढ होणार आहे. म्हणून आपण ती १.२५ करोडपर्यंत गेलेली आहे. म्हणजे याचा अर्थ हा बजेट फुगवलेला नाही. जर बजेट फुगवायचा असता तर गेल्यावर्षी पेक्षा आपण नक्कीच २००० करोड रुपये पर्यंत आपण ते बजेट नेल असतं. परंतु ते नेले नाही नंबर २ अनिल सावंतजीने सांगितल की २०० एम.एल.डी. पाणी योजना ही एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून आपण ती करणार आहोत. फाऊंटन हॉटेल ते भाईंदर मिरा भाईंदर शहरामध्ये जी पाईप लाईन येणार आहे त्याचे डी.पी.आर बनविण्याचे काम आता सुरु होणार आहे. त्याचे कन्सल्टनचे टेंडर स्थायी समितीमध्ये आले होते म्हणजे ह्यावर्षी त्याच्यामध्ये अजिबात खर्च पडणार नाही म्हणून ती प्रोव्हिजन केलेली नाही. त्याच्यानंतर सकवार घनकचरा प्रकल्प आपल्या उत्तन घनकचरा प्रकल्प हा आपण कार्यरत करतो. सौराष्ट्र इन्वायरमेन्ट प्रोजेक्ट ह्या कंपनीला आपण ते दिलेले आहे. त्याच्यामुळे तो सकवार घनकचरा प्रकल्प आपण तो करणार नाहीत. म्हणून तिथे आपण तरतुद ठेवलेली नाही. एस.टी.पी. मध्ये सुध्दा कन्सल्टींगचे टेंडर मंजुरी करिता स्थायीमध्ये आलेल आहे आणि त्याच्यासाठी पान क्र. ६५ याच्यामध्ये अमृत योजना महापालिका हिस्सा साठी कर्जाद्वारे आपण ते प्रोव्हिजन केलेले आहे.

म्हणजे प्रत्येक गोष्टीच त्याच्यामध्ये आरक्षण कुठे विकसित करायच आहे. ती सुध्दा प्रोव्हिजन याच्यामध्ये केलेली आहे. त्याच्यानंतर करवाढ आम्ही करवाढ केलेली नाही असे कुठेच म्हटलेले नाही. माझ्या निवेदनामध्ये मी म्हटलेल आहे यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये कर दर शुल्क यामध्ये अल्पशः वाढ करण्यांत आलेली आहे. म्हणजे आम्ही ते ॲक्सेप्ट केल की खर्चाचा ताळमेळ बसविण्याकरिता मिरा भाईंदर शहराला ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या देण्याकरिता आम्हाला थोडस हे वाढवाव लागल आणि जर तुम्ही आम्हाला सहकार्य केल असतं तर हे संपूर्णपणे वाढ करुन केल कारण आपली जी टॅक्स रेट आहेत हे १९९८-९९ पासुनचे आहेत. ते आजपर्यंत सेम आहेत. हे शहर बदललेले आहे तुम्ही सुध्दा बघा की १९९८ पासुन तर हे २०१८ पर्यंत ह्या शहरामध्ये किती रस्ते झालेले आहेत, किती उद्याने झालेली आहेत, किती नाले झालेले आहेत कितीतरी डेव्हलपमेन्ट झालेली आहेत. तर आपल्याला हे वाढ करणे गरजेचे आहे. तस आपण एक्सप्लेनटीचर वाढवतो तस आपले इन्कम पण वाढवले पाहिजे. यामताशी आपण सुध्दा सहमत असले पाहिजे. परंतु आपली सहमती नसल्यामुळे विरोधकांचे सुध्दा आम्ही ऐकलेले आहे आणि त्याच्यामुळे आम्ही भरपूर कर जे आम्ही वाढविले होते ते आम्ही कमी केले. म्हणजे तुम्ही ज्या सुचना सांगितल्या त्यासुध्दा केल्या त्याच्यानंतर तरण तलाव भाईंदर पूर्वेला इंद्रलोक स्पोर्टस् कॉम्पलेक्स मध्ये तरण तलाव आहे. आता यामध्ये एक प्रपोजल आहे की राष्ट्रीय महामार्ग जो हायवे आहे ॲमिनिटी ओपन स्पेसच्या अंडरमध्ये आपल्याला जे मिळणार आहे तिथे आपण तरण तलाव बांधतो आणि एक भाईंदर वेस्टला आपल्याला शहराचा चौफेर विकास करायचा आहे. फक्त सुविधा भाईंदर ईस्टला किंवा भाईंदर वेस्टला अस नाही. आपल्या संपूर्ण शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी तरण तलाव करायचे आहेत. आणि १०० टक्के ईस्टला पण तरण तलाव करणार हे आज आम्ही बोलतो. त्याच्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आमचे मित्र सन्मा. बोलत होते आजही बाळासाहेब हे आमच्यासाठी आदरणीय आहेत. ज्यावेळी बाळासाहेब ठाकरे कलादालन, प्रमोद महाजन कलादालन ज्यावेळी आपल्याला शासनाची परमिशन मिळेल त्यावेळी १०० टक्के याच्यावरती आपण तरतुद करणार. त्याच्यानंतर एम.एम.आर.डी.ए चे अनुदान एम.एम.आर.डी.ए च्या माध्यमातून आपण विविध विकास कामे केलेली आहेत. आणि रस्ते सुध्दा आपण करणार आहोत. आपला भाईंदर ते उत्तनचा जो आपण रस्ता करणार आहोत तो त्याच्यामार्फत करणार आहोत. जेसलपार्कचा जो रस्ता करणार आहोत आपण त्याच्यामार्फत करणार आहोत. म्हणजे एम.एम.आर.डी.ए. कडून सुध्दा आपल्याला अनुदान मिळणार आहे. आता राहिली बाजार फी बाजार फी आम्ही वाढविलेले आहे. फेरिवाल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही वाढवलेले नाही. आम्ही शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी १६ ते १७ मार्केट आम्ही बनविणार आहोत. त्याच्यामुळे त्या मार्केटचे लोक बसणार आहेत. त्यांची ती फी येणार आहे. म्हणून मी आम्ही टेम्पररी प्रॉक्सीमेटली डिसाईड केलेली आहे. आम्हाला फेरिवाल्यांना वाढवायचे नाही उलट आम्हाला कंट्रोल करायचे आहे. म्हणून आम्ही १६ ते १७ मार्केट शहरामध्ये विविध ठिकाणी बांधत आहेत. त्याच्यानंतर इंडस्ट्रीज याच्यात ह्यावर्षी फंड ठेवलेला आहे. आता इंडस्ट्रीमध्ये तो फंड युटीलाईज केला नाही हे प्रशासनाचे काम आहे. ह्या इंडस्ट्रीजमध्ये त्यांनी तो फंड युटीलाईज केला नाही हे प्रशासनाचे काम आहे. ह्या इंडस्ट्रीमध्ये त्यांनी तो फंड युटीलाईज केला पाहिजे होता. त्याच्यानंतर घनकचरा प्रकल्पामध्ये १२ करोडचे ८ करोड केलेले आहेत. कारण घनकचरा प्रकल्पामध्ये भरपूर जी कामे आहेत ते सौराष्ट्र इन्वायरमेन्टल प्रोजेक्ट हा करणार होता म्हणून आपण तिथे बजेट कमी केलेला आहे. म्हणजे सगळे मुद्दे जे आपण सांगितलेले आहेत ते आपण सगळे मुद्दे कव्हर केलेले आहेत आणि आता तुम्ही बोललात वृक्षप्राधिकरण त्यांच्यासाठी देश का सबसे हरीत सबसे स्वच्छ सबसे सुंदर बनाना है। हमको अपना शहर मिरा भाईंदर इसको ध्यान रख जनता के सहयोग से बनाया है। हमने इसबार यह ड्रीम बजेट इसके लिए हमे चाहिए प्रशासन का सहयोग और आप सभी का साथ आप सभी का हम सब मिल कर हि तो कर पायेंगे हमारे प्यारे मिरा भाईंदर शहर का विकास तभी तो इसे भारत का नंबर वन शहर बनाने में होंगे हम कामयाब सबका साथ सबका विकास. जुबेरजी और एक शेर आपके लिए ॲड भी बहुत है इस बजेट में और खुबीया भी ढूंढने वालों ढूंढो तुम्हे क्या चाहिए इस बजेट में।

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मा. आयुक्त सो., यांनी सादर कलेल्या ‘‘मुळ’’ अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास व सोबत जोडलेल्या यादीतील विकास कामांना आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

सन २०१७-१८ चे सुधारित अंदाज व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 98946.67 | | 136916.71 |
| एकूण खर्च | | 98926.32 | | 136904.41 |
| अखेरची शिल्लक | | **20.35** | | **12.30** |

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

यह आपका जुल्म ए आपके जुल्म की कीरन शहर पर भारी होगी। आजकी रात तुम्हारी हुई तो क्या हुआ कल की खुबसुरत सुबह हमारी होंगी। मिरा भाईंदर महानगरपालिका **सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास** मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजी प्रकरण क्र. ११८, ठराव क्र. १०१ अन्वये स्थायी समितीने प्रस्तावित केले आहे. अर्थसंकल्पात जमेच्या बाजुमध्ये आयुक्तांनी सुचविलेल्या लेखाशिर्षामधील निधीमध्ये बदल न करता खर्चाच्या बाजुत वृक्षप्राधिकरणाच्या अंदाजपत्रकाकडे "अ" अंदाजपत्रकातून स्थलांतरीत लेखाशिर्षाला अनुसरून १४६३.०० लाख वर्ग करण्यात येत आहे. पान क्र. ४९ उद्यान विभाग अनु. क्र. ८) आर.जी. क्षेत्र, उद्याने, नर्सरी विकसित / लॅन्डस्केपींग तरतुदीमध्ये १००.०० + १००.०० = २००.०० लाख रु. निधीत बदल प्रस्तावित आहे. तसेच उर्वरीत लेखाशिर्षकात आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या निधीच्या अंदाजात कोणताही बदल न करता **सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास** मंजूरी देण्यात येत आहे तसेच प्रत्येक नगरसेवकाला १५ लाखाचे प्रभाग निधी विभागून देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**राजु भोईर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आम्ही केलेल्या ठरावामध्ये मा. आयुक्तांनी जे अंदाज सुचविलेले आहेत त्याला मंजुरी दिलेली आहे. त्यालाच मान्यता दिलेली आहे जमेच्याही आणि खर्चाच्या ही बाजूने प्रशासनाने साहेब ठाम भुमिका घेतली तर कोणी काहीच करु शकत नाही हे स्पष्ट आहे. काहीच चुकीचे होणार नाही आज ही यादी आहे त्याच्याबरोबर अजून एक यादी आहे. त्या याद्या जमवाव्या लागणार आहेत.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम ह्या ठरावाला सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. विशेष महासभा दि. २८/०३/२०१८ सुचना प्रकरण क्र. ११० भाईंदर पूर्व परिसरात नवघर रोड येथे तरण तलावाची नागरिकांची मागणी असून त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये आर्थिक तरतुद केलेली होती. परंतु त्यावेळी त्याचा वापर झाला नाही. अर्थसंकल्पात नवघर रोड आरक्षण क्र. १०९ वर तरण तलाव बांधणे कामी तरतुद ठेवण्यात यावी. लोढा गृहनिर्माण संकुलातील ॲमिनिटी ओपन स्पेसमध्ये असलेले तरण तलाव विकासकाने बांधावयाचे असल्याने तो निधी नवघर रोड तरण तलावासाठी वापरण्यांत यावा अशी मी सुचना देत आहे.

**कुसुम गुप्ता :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय मतदान घ्या. दोन ठराव आलेले आहेत.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०५, प्रकरण क्र. ११० करीता प्राप्त झालेले साठी दोन ठराव आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील, अनुमोदन श्री. दिनेश जैन आणि या ठरावामध्ये सुचना आहे. सुचक श्रीम. निलम ढवण यांची. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदन श्री. राजु भोईर.

**जुबेर इनामदार :-**

साहेब डी.एस.आर दिला का कधी करसुची लागेल त्याच्यामध्ये जस आहे प्रशासनाचे काम तुम्ही पूर्ण आयुक्त महोदय प्रशासनाचे पूर्ण काम त्यांनी केल आहे तुम्हाला याच्यापुढे कुठल्याही कनिष्ठ अभियंत्याची गरज नाही, कार्यकारी अभियंत्याची गरज नाही कारण प्लाय इस्टीमेंट करायची गरज नाही. अंदाजपत्रक तयार करण्याची गरज नाही. डी.एस.आर कुठला तो त्यांच्याकडून निश्चित करुन घ्या. दरसुची कोणत्या वर्षाची आहे.

**निलम ढवण :-**

बजेट मिटींगमध्ये पहिलच अस असेल की कामांची सूची पूर्ण त्याच्यावर दाखल केली गेली ही लिस्ट कोणी दिली?

**प्र. नगरसचिव :-**

सुचक श्री. जुबेर इनामदार आणि सुचक निलम ढवण यांची सुचना यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम ठरावाचा निर्णय जाहिर करण्यापूर्वी आता जी यादी जोडण्यात आलेली आहे त्याच्यामध्ये जाणून बुजुन सभापती महोदयांनी मगाशी सांगितल होत की शहराचा आम्हाला सर्वांगीण विकास करायचा आहे. परंतु शिवसेना आण कॉंग्रेसचे जिथे जिथे नगरसेवक आहेत त्यांना जाणुनबुजून डावलण्यात आलेले आहे. हे झाल्यानंतर आम्ही आमच्या वॉर्डामध्ये सांगु लोकांना की प्रॉपर्टी टॅक्स भरायची काही गरज नाही. कारण ह्या वॉर्डसाठी ही महापालिका काही काम करणार नाही तर हा ठराव आयुक्त साहेब तुम्ही विखंडीत करायला पाठवून द्या. तुम्ही तुमच्याप्रमाणे शहरातील सर्व समतोल राखुन विकास कामे करा.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५२, विरोधात २४, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १०५ :-**

**सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मूळ "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १६/०३/२०१८ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. ११८, ठराव क्र. १०१)**

**ठराव क्र. १०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे मा. आयुक्त सो., यांनी सादर कलेल्या ''मुळ'' अंदाजपत्रकात काही दुरुस्त्या करुन मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास व सोबत जोडलेल्या यादीतील विकास कामांना आजची मा. महासभा मंजूरी देत आहे.

**सन २०१७-१८ चे सुधारित अंदाज व सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रक**

(आकडे लाखांत)

| तपशिल | | 2017-18 (सुधारित अंदाज) | | 2018-19 (मुळ अंदाज) |
|---|---|---|---|---|
| एकूण जमा | | 98946.67 | | 136916.71 |
| एकूण खर्च | | 98926.32 | | 136904.41 |
| अखेरची शिल्लक | | **20.35** | | **12.30** |

**सूचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदकः- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | सावंत अनिल दिवाकर | |
| ९ | गोहिल शानू जोरावर सिंह | ९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १० | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १० | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | घरत तारा विनायक | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १६ | अरोरा दिपीका पंकज | १६ | भोईर भावना राजू | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | डिसा मर्लिन मर्विन | निरंक |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | सपार उमा विश्वनाथ | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | पाटील नरेश तुकाराम | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील वंदना विकास | |
| २२ | मुखर्जी अनिता बबलू | २२ | अहमद साराह अकरम | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २५ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २६ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २८ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३० | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| ३१ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्तानी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३८ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३९ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४० | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४२ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४५ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४६ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४७ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४८ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४९ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५० | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ५१ | भोईर गणेश गजानन | | | |
| ५२ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

मिटींग संपली असे मी जाहिर करत आहे.

(सभा संपण्याची वेळ संध्या. ५.१५ वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका